शनिवार । ५ जानेवारी १९८० । ७५ पैसे

माणूस



जर दुकानांसमोर
साखरेसाठी, रॉकेलसाठी
रांगा लावायच्या नसतील
तर बाबूजींच्या मागे
३०० (तीनशे) खासदारांचे
बलाढ्य सैन्य खडे
करायची जबाबदारी
मतदारांची !

# ७७ची पुनरावृत्ती?

# जनता पक्षच या वादळाशी झुंज देऊ शकतो....

श्री. ग. मा.

ठेचा खात, मागील अनुभवांनी शहाणी होत लोकशाही व्यवस्था हळूहळू परिपक्व होत असते. ती काळाबाजार करून एका रात्रीत कमवायची वस्तू नाही. तिच्यासाठी खस्ता खाव्या लागतात, अनेक कठीण प्रसंगातून जावे लागते. दगाफटका, फंदफितुरी, सत्तेचा मोह, पैशाची आमिषे हे सर्व षड्रिपू या व्यवस्थेवर वरचेवर हल्ले करीत असतात. याना तोंड देत देतच ही व्यवस्था हळूहळू रुजते, रुजवावी लागते. जनता पक्ष दुभंगणे, जनता शासन कोसळणे हा षड्रिपूंनी केलेला एक जबरदस्त हल्लाच होता. असे वाटत होते की, या हल्ल्यातून जनता पक्ष व या पक्षाच्या भवितव्याबरोबर बांधली गेलेली भारतीय लोकशाही आता काही लवकर सावरली जात नाही. पण काही माणसाना रोग जसे चटकन् होतात तसेच रोगातून बाहेर पडण्याची त्यांची क्षमताही अद्भूत असते. तसेच या पक्षाचे झाले आहे. दिवसागणिक हा पक्ष वाढतो आहे, मूळपदावर लवकर येण्याचे त्याचे प्रयत्न यशस्वी होताना दिसताहेत. सर्वाधिक संख्येने हा पक्ष येत्या निवडणुकीत यशस्वी होईल यात तर काही शंकाच उरलेली नाही. इतरांवर किती कमी अवलंबून रहावे लागते एवढेच काय ते पाहायचे. जनता लाट नसली तरी वारे तरी जनता पक्ष विजयाच्या दिशेने नक्की वाहू लागलेले दिसताहेत. सुरुवातीची उदासीनता जवळजवळ संपलेली आहे. जगजीवनबाबूच पंतप्रधान होणार हे जवळजवळ नक्की ठरल्यासारखेच असल्याने इंदिरा गांधीकडे झुकणारी दलिताची मतेही ऐनवेळी जनताच्या पारड्यात पुष्कळ ठिकाणी पडल्याशिवाय राहणार नाहीत. मुस्लिम मतात भरपूर फाटाफूट आहे व इमामाच्या फुग्यातली हवा केव्हाच निघून गेलेली आहे. इंदिरा गांधीना दूर ठेवायचे असले तर जनता पक्षाशिवाय पर्याय नाही हे वास्तव आता चव्हाण/अरस यानीही स्वीकारलेले दिसते व यादृष्टीने या दोघाची पावले नक्कीच वळलेली दिसतात. साताऱ्यात स्वत: निवडून येण्यासाठीसुद्धा चव्हाणाना जनतापक्षाकडे धाव घ्यावी लागावी, हा काळाने इतक्या अल्पावधीत उगवलेला केवढा चमत्कारिक सूड आहे? अगदी ज्या संघटनेचा दु:स्वास केला त्या रा. स्व. संघीयांची देखील साताऱ्यात एक बैठक बोलावून स्वयंसेवकाच्या मनातले समजगैरसमज चव्हाणांनी दूर केले म्हणतात. त्यात नको तेव्हा चव्हाणांनी हात दाखवून आणखीनच अवलक्षण करून घेतले. जनता पक्षाचे सरकार कोसळत असताना त्यांना पंतप्रधानपदाची 'ऑफर' मोरारजीकडून आल्याचे त्यांनी एका सभेत मोठा गौप्यस्फोट केल्याच्या आविर्भावात सांगितले. अनेकांना हे माहीत आहे की, मोरारजींनी चव्हाणांना सरकारात सामील होऊन जनता-काँग्रेस राजवट आणण्याची ऑफर दिली होती. यामध्ये चव्हाणांना उपपंतप्रधानपद मिळूनही गेले असते. हिशोब अगदी सरळ होता. ७०।८० लोक जनता पक्ष सोडून गेले होते. चव्हाणाजवळ ७०।७५ लोक होते. त्यांनी मोरारजींचे ऐकले असते तर पुढचा सगळाच गोंधळ टळला असता. यासाठी नानासाहेब गोरे, एस. एम्. जोशी यांनी चव्हाणांची भेटही घेतली होती. पण त्यावेळी जनसंघघटकत्वामुळे जनता पक्ष चव्हाणांना अस्पृश्य वाटत होता. शिवाय मोरारजी, बाबूजी डोक्यावर असताना पहिल्या स्थानाची अपेक्षा बाळगीत दुसऱ्या स्थानावर बरेच दिवस चव्हाणांना कळ काढीत बसावे लागणार होते! ही माणसे वर असताना जागा खाली होणार केव्हा आणि चव्हाणाना पंतप्रधानपद देणार कोण? असा सगळा हिशेब माडून चव्हाणानी मोरारजीचे आवाहन नाकारले आणि त्याच्या घसरगुंडीला सुरुवात झाली. कारभाराबद्दल जो लौकिक आणि दबदबा होता तोही या चार महिन्याच्या उपपंतप्रधानकीत पार धुळीला मिळाला


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : बत्तिसावा
५ जानेवारी १९८०
किमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

आणि साताऱ्यात संघ/जनसंघीयाच्या मनातील किल्मिषे दूर करण्यासाठी धावाधाव करावी लागली ती वेगळीच ! एकही क्षेत्र असे नाही की, ज्यात चरण चव्हाण सरकारची अब्रू चव्हाट्यावर आली नाही. परदेशात तर भारताची किंमत एवढी कधीच कमी झाली नव्हती, जेवढी ती या चार महिन्यात झाली. क्यूबासारख्या टिचभर देशाचा प्रमुखही भारताच्या परराष्ट्रमंत्र्याला भेटीसाठी आठ-आठ दिवस ताटकळत ठेवू शकतो, ही आज आमची परदेशातली प्रतिमा ! देशातला बट्ट्याबोळ तर विचारायलाच नको. आसामने दिल्लीला पूर्ण धाब्यावर बसवलेले आहे, तर उत्तरप्रदेश-मध्यप्रदेश--राजस्थान, म्हणजे जवळजवळ निम्मा हिंदुस्थान दुष्काळात टाचा घासतो आहे. शहरातून रॉकेल, साखरेसाठी पुन्हा तळतळाट सुरूच आहे. कांदा पाच रुपये किलो व्हावा ही तर या चरण-चव्हाण सरकारच्या नाकर्तेपणाची हद्द झाली. एवढे कमकुवत व नामधारी सरकार यापूर्वी दिल्लीत बहुधा शेवटचा मोगल बादशहा बहादूरशहा जफर याचेच असावे. काय मिळवले चव्हाणांनी त्यावेळी मोरारजींची ऑफर नाकारून, हे त्याचे त्यानाच माहीत. दिल्लीतले हे अपयश तर या उतारवयात भुईंज, वाठार, खंडाळा, म्हसवड असल्या किरकोळ ठिकाणी सध्या सभा घेऊन मते मागत फिरण्याची पाळी ! एकेकाळच्या महाराष्ट्राच्या या अभिषिक्त नेत्याची यात कोणती शान उरली ! जे आज नाईलाजाने करावे लागते आहे तेच त्यावेळी योजनापूर्वक केले असते तर ? ते ज्या काँग्रेसमध्ये वाढले, ज्या काँग्रेसने त्याना सत्तापदे दिली ती संपलेली काँग्रेस आहे हे वास्तव आता तरी त्यांनी ध्यानात घ्यायला हवे. गांधी-नेहरूंच्या काँग्रेसचा वारसा आज तरी जनता पक्षाकडे आलेला आहे. हा वारसा अधिक भक्कम करण्याचे सोडून मावळलेल्या सूर्याच्या साक्षी काढण्यात काही 'राम' उरलेला नाही. इंदिरा गांधीचा पर्याय त्याना पूर्णतया वर्ज्य असेल तर जनता पक्षाच्या रामाकडे जाण्याशिवाय सध्या तरी त्याना गत्यंतरच उरलेले नाही. तिसरी शक्ती, डावी आघाडी, गांधी-नेहरूंची जुनी काँग्रेस, लोकदल वगैरे सगळे खुळखुळे मोडून पडलेले आहेत. दुर्दैवाने इंदिरा गाधी व त्यांची सजय चौकडी प्रबळ झाली तर लोकशाहीसाठी पुन्हा उभे राहायला जनता पक्ष हाच एकमेव आधार सध्या तरी उपलब्ध आहे. या आधारवृक्षाच्या मूळावरच घाव घालत राहणे हे आत्मघातकीपणाचे आहे. हा आत्मघातकीपणा यापुढे तरी थाबायला हवा. जनता पक्षाने हे घाव विसरून चव्हाणाना साताऱ्यात पाठिंबा द्यायची योग्य भूमिका घेतली आहे. चव्हाण आता याची परतफेड कशी करतात ते पाहायचे. पुलोदसारखे सरकार दिल्लीत येणार हे आता ते म्हणू लागलेले आहेत. पण याचा अर्थ नवीन सरकारात चव्हाण असू शकतील एवढया जागा तरी त्यांच्या काँग्रेस पक्षाला मिळतील एवढाच घ्यायचा. महाराष्ट्रात जसे बहुसंख्य जनता पक्षाच्या डोक्यावर अल्पसंख्य पवार-काँग्रेसला बसवता आले तसे तर काही दिल्लीत घडू शकणार नाही, हे उघड आहे. फार तर मोरारजीऐवजी यावेळी बाबुजीची नंबर दोनची ऑफर ! पण यासाठी सुद्धा जनता पक्षावर येताजाता वार करण्याची चैन त्यांनी आता सोडून दिली पाहिजे. त्यांना नको असलेला जनसघ घटक जनता पक्षातच राहणार आहे. या वस्तुस्थितीशी त्यानी जमवून घेतले तर अजूनही इंदिरा गांधीना समर्थ लोकशाही पर्याय या देशात यशस्वी ठरू शकतो. एकटे यशवंतराव, एकटे अरस, एकटे पवार किंवा त्यांची उरलीसुरली मूळ काँग्रेस या इंदिरा वादळाला आवर घालू शकत नाही, हे आता पुरेसे सिद्ध झाले आहे. जनता पक्षच या वादळाशी झुंज देऊ शकतो— ७७ साली हे एकदा निदर्शनास येऊन गेलेले आहे. मग ७७ ची पुनरावृत्ती होण्यास हातभार लावायचा का कुठले जुनेपुराणे वाद उकरून काढीत ही नको असलेली पण आता अपरिहार्य ठरलेली निवडणूक इंदिरा गांधीच्या हाती जाऊ द्यायची ? □

## १९८० सालची दिनदर्शिका

| ऑक्टोबर | मे | फेब्रुवारी ऑगस्ट | मार्च नोव्हेंबर | जून | सप्टेंबर डिसेंबर | एप्रिल जुलै जानेवारी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार | रविवार | × | ६ | १३ | २० | २७ |
| मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार | रविवार | सोमवार | × | ७ | १४ | २१ | २८ |
| बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार | रविवार | सोमवार | मंगळवार | १ | ८ | १५ | २२ | २९ |
| गुरुवार | शुक्रवार | शनिवार | रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | २ | ९ | १६ | २३ | ३० |
| शुक्रवार | शनिवार | रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | ३ | १० | १७ | २४ | ३१ |
| शनिवार | रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | ४ | ११ | १८ | २५ | × |
| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार | ५ | १२ | १९ | २६ | × |

प्रेषक : विजय बाजी दळवी, मुंबई

जनता पक्षाच्या आक्रमक प्रचाराचा नमुना दाखविणारे एक पत्रक

## आपल्या लक्षात रहाणाऱ्या चार दिवाळ्या

| इंदिरा राज्य | | जनता राज्य | | चरण, चव्हाण राज्य |
|---|---|---|---|---|
| वस्तू | १९७६ | १९७७ | १९७८ | १९७९ |
| तांदूळ | रेशन | २-८० | २-०० | ३-२० |
| गहू | १-९० | १-८५ | १-७० | २-२० |
| चणा डाळ | २-७५ | २-५० | ३-०० | ३-२० |
| शेंगदाणे | ४-८० | ३-८० | ३-८५ | ६-०० |
| साबूदाणे | ३-५० | २-३० | २-७० | ४-६० |
| साखर | ४-९५ | ४-०० | २-४० | २-९३ |
| गूळ | २-७० | २-४० | २-०० | ३-४० |
| गोडेतेल | ८-२० | ६-७५ | ७-०० | १२-२० |
| डालडा | ९-५० | ९-०० | १०-०० | १२-५० |
| खोबरे | १२-०० | १०-०० | १३-०० | १५-५० |
| रवा | रेशन | १-९५ | २-१५ | २-४० |
| मैदा | रेशन | १-९५ | २-०० | २-४० |
| आगपेटी | १२ पैसे | १२ पैसे | १२ पैसे | २० पैसे |
| चहा | १५-०० | १४-०० | १४-०० | १८-०० |

## आपणास कोणाचे राज्य हवे आहे ?


## Announcement

The Institute of Social Studies invites students / researchers / voluntary workers to recommend a voluntary effort from his / her state which satisfies the following criteria :

1. Working for women's development 2. Reaching poorest sections
3. Helping minimum 50 persons 4. Achieving self-reliance

The Institute will be glad to Provide an honorarium of Rs. 500/- to the person who recommends a project of the above description from his / her state.

For further details contact:—

**Mrs. R. Bezboruah**
Institute of Social Studies
C/o Industrial Development Services
M-1, Kanchenjunga, 18, Barakhamba Road,
New Delhi - 110 001.

# मी तर निवडून येणार आहेच पण पक्षालाही बहुमत....

## –रवींद्र वर्मा

मुलाखत : सुधीर जोगळेकर

'पाणीवाली पाणीमें ।
भाऊसाहेब गल्लीमें ।
रवींद्र वर्मा दिल्लीमें ।'

'आय नाय, बाय नाय ।
जनतेवाचून उपाय नाय ॥'

या दोनच घोषणांनी सध्या उत्तर मुबई मतदारसंघातला जोगेश्वरीपासून वसईपर्यंतचा टापू दणाणला आहे या मतदारसंघातल्या रवींद्र वर्मा–मृणाल गोरे–भाऊसाहेब वर्तक लढतीकडे अवघ्या भारतीयांचे लक्ष लागून राहिले आहे. आणि दस्तुर खुद्द मोरारजीभाईंच्या मुंबईच्या झंझावाती दौऱ्यानंतर मतदारसंघातले राजकीय वातावरण पूर्णत्वाने ढवळून निघाले आहे. काही लाखाच्या फरकाने निवडून आलेल्या मृणाल गोरे, तेवढ्याच लाखाच्या फरकाने चारीमुंड्या चीत होतील अशी खात्री इथला सामान्य मतदार देऊ लागला आहे. खरी लढत आहे ती या दोघांमध्येच.

जनता उमेदवार या नात्याने रवींद्र वर्मांचे नाव घोषित होण्यात झालेला अनावश्यक कालापव्यय, मतदारसंघाबाहेरचा लादलेला उमेदवार यासारखे गढूळ वातावरण केव्हाच धुवून निघाले आहे आणि आणीबाणीत ठाणे कारागृहात स्थानबद्ध असताना मुंबईकरांशी जुळलेले नाते गेल्या दीड महिन्यात अधिकच दृढ झाले आहे. बहुरंगी-बहुभाषी स्वरूपाचं मतदारसंघाचे रूप स्वतः श्री. रवींद्र वर्मांच्या आठ भाषावरील प्रभुत्वामुळे आपलसं झालं आहे. प्रमुख मतदाराच्या छोट्या–छोट्या बैठकामध्ये या हिंदी–मराठी–इंग्रजी–कानडी–तेलगू–उर्दू आदी भाषाचं दर्शन तर घडलं आहेच, पण घरोघरच्या भेटीमध्ये एखादा हिमाचल प्रदेशातला गढवाली नाही तर उत्तर प्रदेशातला भोजपुरी भेटला तर त्याच्याशीही त्याच्या–त्याच्या बोली भाषेतून साधलेल्या संपर्कामुळे हे आपलेपण अधिक वाढले आहे.

मुंबईतील समाजवाद्यांचे 'पॉवर हाऊस' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मृणालताई या मतदारसंघातून अपक्ष उमेदवार या नात्याने उभ्या आहेत. ७७ ची पुनरावृत्ती घडेल आणि आपण सर्वांना पराभूत करून विजयी होऊ शकू असे त्याना वाटत असले, तरी जनता पक्षाचे सरकार पाडण्यात त्यांनी मोठा वाटा उचललेला असल्यामुळे मतदार मात्र खूपच नाराज आहेत. स्वतःचेच सरकार पाडून पुन्हा ३० महिन्यानंतर सत्तेच्या लालसेपायी स्वतःच्याच त्या जनता पक्षाचा पाठिंबा मागण्यास धजावणाऱ्या व्यक्तीला पुन्हा कशाला निवडून द्यायचे, अशी चर्चा सर्रास मतदार करीत असतात. आणि त्यामुळेच बाईंनी पोस्टरद्वारा कितीही म्हटले की,

'कोई कुछभी है, हमारा रिश्ता अटूट है ।'

(तरीही जनतेने झिडकारले आहे.)

'ताई नाता था लेकिन, गद्दारीके बाद टूट गया ।' या पोस्टरद्वारा त्यानी त्या नात्याला अव्हेरलं आहे आणि त्याचीच प्रचिती ३ तारखेच्या मतदानात येणार आहे.

मृणालताईंच्या बाजूने या लोकसभा मतदारसंघात उभे असलेल्या जनता आमदार बाबूराव सामंत, मालाडच्या जनता आमदार कमल देसाई व मुबई महानगरपालिकेतील पाच जनता नगरसेवक यांचे पक्षसदस्यत्व अलीकडेच स्थगित करण्यात आले आहे. समस्त मुंबईकर समाजवादी या पॉवर हाऊसमध्ये अजूनही पॉवर भरू शकतो या घमेंडीत आहेत आणि त्यासाठीच त्यानी ही सीट 'प्रेस्टीज सीट' केली आहे.

पण असे असले तरी अल्पावधीत लोकप्रिय झालेल्या रवींद्र वर्मांनी वातावरणात वेगळाच विश्वास उभा केला आहे. 'पक्षद्रोह्यांविषयी जनतेच्या मनात असलेला जालीम रोष ३ तारखेच्या मतदानात स्पष्टपणाने प्रगट होईल व चौधरी चरणसिंगांसकट सर्व पक्षद्रोही प्रचंड मतानी पराभूत होतील' असा ठाम आत्मविश्वास श्री रवींद्र वर्मांनी मला दिलेल्या खास मुलाखतीत व्यक्त केला आहे.

मुंबईकर मतदार प्रबुद्ध आहे. जनता पक्षाने सत्तेवर येताच ज्या शैक्षणिक-सामाजिक परिवर्तनाचे अभियान सुरू केले आहे त्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे याविषयी समाधान व्यक्त करून ते म्हणाले, हा पाठिंबा असाच चालू राहील याचा मला भरवसा वाटतो.

निवडणुकीनंतर पुन्हा पक्ष दुभंगण्याची शक्यता पार फेटाळून लावून ते म्हणाले, 'मी तर निवडून येणार आहेच, पण माझ्या पक्षालाही स्पष्ट बहुमत मिळणार आहे आणि त्यामुळे पक्षत्याग करावा लागलाच तर तो अन्य पक्षातील मंडळींना करावा लागणार आहे. येत्या निवडणुकीत इंदिरा काँग्रेस पूर्णपणाने dissimilate होईल व इं. काँ. मधलीच अनेक मंडळी जनतात प्रवेश करतील असे मला वाटते.

निवडणुकीनंतर भरणाऱ्या नव्या लोकसभेत आम्ही पक्षांतरविरोधी विधेयक मांडणार आहोत. गेल्याच अधिवेशनात हे विधेयक संमत होणार होते पण आमच्या पक्षातल्या लिमये-फर्नांडिस आदी मंडळींनी




**बोरिवली येथील विराट सभेत भाषण करताना श्री. मोरारजी देसाई (डावीकडून) नगरसेवक श्री. मोहनभाई परीख, आ. ग. भा. कानिटकर, श्री. रवींद्र वर्मा, श्री. राम नाईक, नगरसेवक श्री. चिमणभाई मेहता.**

□

त्याला विरोध केला आणि सारेच बारगळले. या विषयावर पक्षांतर्गत विचार व्हावा अशी सूचना पुढे आली आणि तसाच विचार झाला. नव्या परिस्थितीत लिमये-फर्नांडिसांसारखी पक्षबदलू माणसे पक्षात राहिलेली नसल्याने हे जमू शकेल.

: ४६ वी घटनादुरुस्ती रद्द करवून घेण्यासाठी आम्ही ज्या पद्धतीने झगडलो, त्याच पद्धतीने त्याच ईर्षेने पक्षांतरविरोधी विधेयक संमत करवून घेण्यासाठी आम्ही प्रयत्न करू व त्यात यशस्वी होऊ.'

अलीकडे राजकीय ध्रुवीकरणाची भाषा सर्वजण वापरू लागले आहेत. या कल्पनेवर कडक टीका करताना ते म्हणाले, 'ध्रुवीकरणाचा प्रश्न येतोच कुठे ? जनशक्तीच्या रूपाने समर्थपणाने उभा असलेला जनता पक्ष आणि इंदिराजींच्या वैयक्तिक प्रतिमेवर सारी भिस्त असलेला इंदिरा काँग्रेस पक्ष या दोनच ध्रुवांभोवती सारी गोळाबेरीज चालू आहे. तत्त्वांसाठी ही गोळाबेरीज झाली तरच तिला खऱ्या अर्थाने ध्रुवीकरण म्हणता येईल, अन्यथा हे opportunistic galloping आहे असेच म्हटले पाहिजे.

: लोकशाहीवर श्रद्धा असणारे काही पक्ष आणि वरवर श्रद्धा ठेवणारे काही पक्ष असा असा विचार केला तर दोघांपैकी एकाचेच असणे जसे अहितकारक आहे, तसेच दोघांनीही 'मीच देशभक्त आहे' असा दावा करणे अयोग्य आहे. राजकारणात डावे-उजवे असे विभाजन असले तरीही गरिबांचा कैवार प्रदर्शित करणारे तेच डावे असे समीकरण मांडणेही बरोबर होणार नाही. गरिबांच्या कैवाराचे सहानुभूतीचे अनेक पर्याय असू शकतात, तसे असले तरच लोकशाही खऱ्या अर्थाने जिवंत राहू शकते. वस्तुतः गरिबांचे सर्रास अधिक शोषण डाव्यांनीच केले आहे.

: गांधीजींनी जो मार्ग दाखविला तो आम्ही कुणीही समजू शकलो नाही. शोषणरहित विकेंद्रित अर्थव्यवस्थेची संकल्पना आम्ही प्रत्यक्षात आणू शकलेलो नाही. तोच श्रेष्ठ मार्ग आहे याची कल्पना आल्यामुळे जगभरातील विचारवंतही याच निर्णयाला येऊन पोचू लागलेले असताना आम्ही भारतीय मात्र बुरसटलेल्या विचारांची गाठोडी या भूमिकेतून त्याला विरोध करीत आहोत. हे सारे समजून घेण्याचीच कोणाची तयारी नाही. ते न घेता राजकीय गोळाबेरीज आणि ध्रुवीकरणाची कल्पना चालू आहे आणि म्हणून मी म्हणतो की ही एक सवंग लोकप्रियता लाभलेली फॅशनेबल, मतलबी पुढाऱ्यांची घोषणा झाली आहे, इतकेच.'

श्री. वर्मांची ही विविध विषयांवरची स्पष्ट मतेच त्यांच्या लोकप्रियतेला कारणीभूत ठरली आहेत. सामान्यातून उभे राहिलेले हे

असामान्यत्व आणीबाणीतल्या लोकसंघर्ष समितीच्या भूमिगत कार्यातून आणि मजूरमंत्री या नात्याने बजावलेल्या चोख कामगिरीतून केव्हाच प्रगट झाले आहे.

गुजराथी समाज उत्साहाने कामाला लागणे हे या मतदारसंघात विजयाचे निदर्शक मानले जाते. भूतपूर्व पंतप्रधान मोरारजीभाई देसाई याच्या २०/२० हजाराच्या सभा, भूतभूर्व परराष्ट्रमंत्री व कायदेमंत्री सर्वश्री बाजपेयी व शातीभूषण याच्या सभाना मिळालेल्या प्रचंड प्रतिसादामुळे हा समाज मोठ्या प्रमाणावर कार्यरत झाला आहे.

कॉंग्रेसतर्फे मात्र कोणीही मोठा पुढारी इकडे फिरकलेला नाही. टेम्पो फिरवून लाउडस्पीकरद्वारे भाषणे ठोकण्यास व 'साथी हाथ बढाना' या गीताची टेप वाजविण्यास कॉंग्रेसने सुरुवात केली असली तरी त्यांचा फारसा जोर दिसत नाही.

श्रीमती गोरे यांचेकडे तर वक्ते व कार्यकर्ते या दोघाचीही वानवा आहे. फर्नांडिस आणि लिमये दोघेही आपल्या जागा वाचविण्याच्या खटपटीत असल्याने त्याना इकडे येण्यास अवधी मिळालेला नाही. गोरेगावचा एक गट रामलीलेच्या पार्टीसारखा. रोज तोच नटसंच घेऊन, तोच रंग तोंडाला फासून, जागा बदलत रोज तोच प्रयोग करीत फिरतो आहे. 'कार्डे छापून तयार आहेत, लिहिण्यासाठी कार्यकर्त्यांनी घेऊन जावीत' असे फलक मृणालताईंचे निवडणूक कार्यालय असलेल्या कमल देसाईंच्या घरावर लागले आहेत.

समांतर कॉंग्रेसने पाठिंबा जाहीर करूनही पवार–चव्हाण किंवा अन्य कोणीही बडा नेता अद्याप या मतदारसंघाकडे फिरकलेला नाही याचेही सर्वांना आश्चर्य वाटत आहे. पराभूत होणाऱ्या उमेदवारासाठी आपली शक्ती पणाला लावावी असे त्याना वाटत नसल्याचे बोलले जाते ते यामुळेच.

जनता पक्षाने आपला प्रचार सुरू केल्यापासूनच विरोधी पक्षीयानी हाय खाण्यास सुरुवात केली आहे.

'सागा भाऊ, सागा ताई ।
जनता राज्यात होती का टंचाई ?'
सस्ती चिनी, सस्ता तेल ।
नही नसबंदी, मिसा जेल ।
गद्दारोको सबक सिखाओ ।
जनता पार्टी विजयी बनाओ ।'

यासारखा आक्रमक प्रचार जनता पक्षाने सुरू केला आहे. इंदिराराजवटीत, जनताराजवटीत आणि पक्षफुटीराच्या राजवटीत वाढलेल्या किंमतीचा तक्ताच जनता पक्षाने प्रसिद्ध करून मृणालताईंच्या सरकारच्या राज्यातले दिवाळे वेशीला टांगले आहे. 'अब नाता टूट गया है' याची पुरेशी कल्पना मृणालसमर्थकाना येऊ लागली आहे. तीन तारखेच्या घोडामैदानात याची प्रचीती येणार आहे.

□

---

## उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघ

मतदार संख्या : ८,४५,२३३, मतदान केंद्रे : ८३४

# समर्थकांची स्थिती : कोण कोणीकडे ?

* **जनता (रवींद्र वर्मा):** रिप. (कांबळे), रिप (खोब्रागडे), शिवसेना, मुस्लीम लीग, गुजराती समाज, झोपडपट्टी, आदिवासी, आ. राम नाईक (बोरिवली), हसमुख उपाध्याय (पुरवठा मंत्री, कांदिवली), आ. पंढरीनाथ चौधरी (वसई), आ. अर्जुन शिंगाडा (पालघर, आदिवासी), वसईचे भूतपूर्व आ. प्रा. वर्टी, पालघरचे भूतपूर्व आ. नवनीतभाई शहा, ठाणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वासुदेवराव वर्तक, पालघर व वसई तालुका पंचायती, मुंबई महापालिकेचे या क्षेत्रातले १० नगरसेवक, वसईचे डॉमनिक गोन्सालवीस.

* **अपक्ष (मृणाल गोरे) :** आ. बाबूराव सामंत, (गोरेगाव), आ. कमल देसाई (मालाड), तुलसीबोडा, सदाशिव बागाईतकर, आदी ज्येष्ठ नेते मंडळी आणि मुंबई महापालिकेचे या विभागातले ५ नगर सेवक, –झोपडपट्टीवासीय, वसईतील ख्रिश्चनाचे काही गट, आदिवासीचा एक गट, पालघर भूमिसेना.

* **इ. कॉं. (भाऊसाहेब वर्तक ) :** वसई व पालघर तालुक्यातील पानमाळी समाज, सामवेदी समाजातील मोठा गट, काही आदिवासी व झोपडपट्टीवासीय मतदार.–कार्यकर्त्यांची वाण, पैसा भरपूर.

# जनता पक्षाची कामगिरी चांगली

## —जयवंत दळवी

**प्रश्न : सध्याच्या राजकीय परिस्थितीबाबत आपले काय मत आहे ?**

**उत्तर :** सध्या जी गोंधळाची आणि सतापजनक राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे तिला स्वार्थी आणि संधिसाधू लोक कारणीभूत आहेत. समाजाचा किंवा देशाचा विचार करून राजकारण न करता काही आपमतलबी लोकानी स्वत चा विचार करून राजकारण केले. चरणसिंग हेच या सर्वांना कारणीभूत आहेत. प्रारंभापासून त्याच्या सर्व हालचाली तिरकस होत्या. राजनारायण त्यांचेच हस्तक म्हणून काम करीत होते. पुढे मधु लिमये, जॉर्ज फर्नांडीस आणि मृणाल गोरे त्याना मिळाले. या सर्वांना शेवटी शेवटी असे वाटले की जनता पक्षातले बहुसख्य खासदार त्यांना मिळतील, शिवाय इतर पक्षातले काही 'प्रागतिक (?)' हातमिळवणी करतील आणि त्याना सरकार प्रस्थापित करता येईल. चरणसिंग पंतप्रधान होताच " माझी आयुष्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण झाली " असे बालीश मूर्खपणाचे उद्गार चरणसिंगांनी काढले. यावरून त्याचे राजकीय डाव किती वैयक्तिक होते याची कल्पना येते. पण बहुसंख्य जनता खासदार जनता पक्षाशी एकनिष्ठ राहिले आणि त्याचा डाव फसला. जे करणे शक्य नव्हते ते करायला गेलेल्या या मंडळीनी मूर्खपणा पदरी घेतला. परिणामी या मूर्खापेक्षा अधिक धूर्त असलेल्या इंदिरा गाधीनी आणि संजय गांधीनी परिस्थितीचा फायदा घेतला.

**प्रश्न : ज्या दुहेरी सदस्यत्वाचा आधार घेऊन ( किंवा बाऊ करून ) या मडळींनी पक्ष फोडला त्याबाबत आपले काय मत आहे ?**

**उत्तर :** मला हा प्रश्न महत्त्वाचा वाटत नाही. इंदिरा गाधी आणि तिचे चाडाळ एक शक्ती म्हणून अस्तित्वात असेपर्यंत असले प्रश्न निर्माण करणे हे मूर्खपणाचे आहे. जोपर्यंत जनता पक्षाच्या कुठल्याही कार्यक्रमाला कुणी विरोध करीत नाहीत किंवा ते कार्यक्रम खच्ची करण्याचे डावपेच खेळत नाहीत तोपर्यंत त्याना नावे ठेवण्याचा कुणाला अधिकार नाही. या सगळ्या प्रश्नाचे मूळ कारण म्हणजे जनता पक्षातल्या माजी जनसंघीयानी चरणसिंगाची महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यास हातभार न लावता मोरारजी देसाई यांना पाठिंबा दिला. हे मूळ कारण ! तसेच माजी जनसंघी आणि रा. स्व. संघी याची शिस्तीने कार्य करण्याची सवय राजनारायण आणि मधु लिमये यांना जाचक वाटली. या दोघानीही आयुष्यात शिस्तीने काहीही केलेले नाही. पक्षबाधणी, सस्थाउभारणी या महत्त्वाच्या गोष्टी या दोघांनी आपल्या आयुष्यात कधी केलेल्या नाहीत. त्यामुळे संघीयाची शिस्तबद्ध फळी आपल्या लोकाना जनता पक्षात बहुसंख्येने आणतील आणि आपल्यासारख्या एकाड्या शिलेदाराना हाकलून लावतील ही भीती त्यांना वाटली म्हणून ते पक्ष फोडण्यास उद्युक्त झाले. पक्षफोडेपणाचा परिणाम काय होईल एवढेसुद्धा त्याना जाणता आले नाही

**प्रश्न : ज्या सघावरून हा वाद झाला त्या सघाबाबत आपले काय मत आहे ?**

**उत्तर :** सर्व संस्थात कमीअधिक दोष आहेत. तसे ते रा. स्व. संघातही आहेत. परतु एकूण गोष्टी लक्षात घेता संघाबद्दल माझे मत बरे आहे. जनता पक्षाची निर्मिती आणि त्यानंतरचा काळ या काळात संघ आणि जनसंघ याचे लोक फार चागले वागले. त्यामुळे त्यांची प्रतिमा उजळच झाली आहे. बाळासाहेब देवरस याच्याशी माझ्या एकदोनदा चर्चा झाल्या आहेत. ते पुरोगामी व सेवाभावी आहेत असे मत झाले आहे. १९४७ पूर्वीचा संघ तसाच राहिलेला नाही. तो सुधारतो आहे. सघावर आपुलकीने दबाव आणीत त्यात अधिक सुधारणा घडवून आणणे शक्य आहे. परतु सेवा, देशप्रेम; संस्कृतिप्रेम, शिस्त याबाबतीत संघ ही उत्तम संस्था आहे असे मी मानतो. संघ ही पूर्वीसारखी शाखाबद्ध संस्था राहिलेली नाही. संघ आता जनसेवा, वृत्तपत्रे, चर्चामंडळे, मजूरसस्था, विद्यार्थी परिषदा यासारख्या आघाड्यात विखुरला आहे. हा मार्ग मला स्तुत्य वाटतो.

**प्रश्न : डावी आघाडी करण्याचे जे प्रयत्न आहेत त्याबाबत आपले काय मत आहे ?**

**उत्तर—** डावी आघाडी हे एक मधु लिमये यांचे खूळ आहे. जनता पक्षात असताना ते या खुळ्या कल्पनेशी खेळत होते. सध्या ते लोकदलाचे चिटणीस आहेत म्हणून डाव्या आघाडीबद्दल फारसे बोलत नाहीत. कारण बऱ्याचशा डाव्या लोकांना चरणसिंगांच्या आणि राजनारायणाच्या लोकदलाचे आकर्षण राहिलेले नाही ज्या लोकात प्रामुख्याने स्वत:चा व्यक्तिविचार अधिक आहे असे लोक तोल सावरण्यासाठी कुबड्या शोधीत असतात. मधु लिमये आणि राजनारायण यांनी १९४८ सालापासून काही पक्ष एकत्रित आणणे आणि मग ते स्वत च्या अहंकारापोटी फोडणे हे एकच काम सातत्याने केले आहे. थोडयाच दिवसांत ते चरणसिंगांचा पक्ष फोडतील आणि आणखी काही तुकडे नव्याने जोडण्याचा यत्न करतील. तो यत्नही जे जोडले ते फोडण्यासाठी असेल !

**प्रश्न : जनता पक्षाच्या राजवटीबद्दल आपले काय मत आहे ?**

**उत्तर :** जनता पक्षाने थोडक्या अवधीत खूप चागले कार्य केले इंदिरा गांधीने बरखास्त केलेली स्वातंत्र्ये जनतेला परत दिली गरजेच्या वस्तूची मुबलकता आणली. स्वस्ताई आणली. हजारो खेड्याना पिण्याचे पाणी दिले. कामगारांना बोनस दिले येथे जनता सरकारच्या कार्याची जंत्री देणे शक्य नाही. परंतु जनता सरकारवर अविश्वासाचा ठराव आला असताना सरकारचा बचाव करताना जॉर्ज फर्नांडीस यानीच जे भाषण केले ते जिज्ञासूनी पहावे. आणि तेच जॉर्ज फर्नांडीस मधु लिमये यांच्या प्रभावामुळे नंतर दोन दिवसानी पक्ष फोडून बाहेर पडले.

**प्रश्न : निवडणुकांच्या निकालाबद्दल आपले काय मत आहे ?**

**उत्तर—**एकूण अंदाज घेता मला खात्रीने असे वाटते की जनता पक्षाला २७० ते २७५ जागा मिळतील. १९७७ साली दोन दोन लाखाच्या फरकाने जनताचे लोक निवडून आले. तसे होणार नाही. पण कमीअधिक मतानी का होईना पण जनता पक्ष बहुमतात येईल. याचे मुख्य कारण म्हणजे लोकाना जनता पक्षाबद्दल सताप नाही. असलीच तर थोडी खंत आहे. एखाद्या भल्या इसमाला मतलबी माणसाने फसवल्यानंतर भल्या माणसाबद्दल लोकाना जे वाटते तेच आज जनता पक्षाबद्दल वाटते आहे. पक्षफोडे, स्वार्थी, संधिसाधू लोक जनता पक्षातून गेल्यामुळे आताचा जनता पक्ष अधिक कसदार झाला आहे. या पक्षालाच लोक उचलून धरतील. इंदिरा-संजय याचा पक्ष पुनश्च आणीबाणी आणि अत्याचार आणील अशी लोकाच्या मनात वास्तव भीती आहे. चरणसिंगाचा पक्ष जातीय आहे. काही पोटजातीवर अवलंबून असलेला पक्ष आहे. तो नगण्य आहे. शिवाय राजनारायण व मधु लिमये त्या पक्षाला फोडतीलच. ☐

**[ सा. विवेक, २३ डिसेंबर, ७९ अंकावरून साभार पुनर्मुद्रित. ]**

बगाड (४)

# हेही विचारवंत

बघ्या

दूधवाडीचं गुलाबराव कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स हे आमचे मित्र चाफाजीराव यानी त्यांच्या वडलांच्या स्मरणार्थ काढले. त्याच कॉलेजात मी पूर्वी शिक्षक म्हणून होतो. गुलाबराव कॉलेजचे प्राचार्य माणिकराव चादगुडकर याची आणि माझी मैत्रीही जुनीच. परवा त्यांनी मला भेटायला बोलावले. तातडीचा निरोप, माणिकरावाचा अधिकारही मोठा म्हणून लागलीच गेलो.

गेल्या गेल्या माणिकरावांनी चागलंच फैलावर घेतले मला. मी 'माणूस'मध्ये लिहितो हे त्यांना माहीत होतेच. पण मी माणूसचा संपादकच आहे असे समजून त्यानी भलतीच झोड उठवली. त्यांच्या म्हणण्याचा साराश असा की, सध्या 'माणूस'मध्ये विचारवंताच्या म्हणून ज्या मुलाखती प्रसिद्ध होत आहेत त्या पूर्णपणे एकतर्फी आहेत. पहिले, म्हणजे ही माणसे विचारवंत असे कुणी ठरवले? की पुण्याच्या पाढरपेशातला जो उठतो त्याला विचारवंतच समजले जावे? हे सर्व गृहस्थ विचारवंत असले तरी याची समाज–मनस्कता किती, याचा जनतेशी आणि बहुजन–समाजाशी संबंध काय; यांना ग्रामीण भागाची काही माहिती आहे का; सहकारी चळवळ आणि जिल्हा परिषदा याच्यामुळे ग्रामीण भागाचा आणि ग्रामीण नेतृत्वाचा जो काया–पालट झालेला आहे त्याची यांना जाणीव आहे का?

मला चांदगुडकर गुरुजीच्या बोलण्याचा रोख कळला. मी त्यांना सागितले की, तुम्ही दूधवाडीसारख्या दूरच्या गावी असल्याने तुमची मुलाखत 'माणस'च्या संपादकाना आजवर घेता आली नाही. पण आता मी आलोच आहे, तर तुमची मुलाखत घेतो. तुम्हाला जे काही म्हणायचे असेल ते स्पष्ट शब्दात आणि भीडभाड न ठेवता माडा. पुण्यातल्या अहंमन्य विचारवताना कळूच द्या एकदा की किती सूक्ष्म विचार करणारे लोक दूधवाडीसारख्या ठिकाणीदेखील आढळतात.

चाफाजीरावांनी इंदिरा–कॉंग्रेसचे तिकीट मिळवण्याचा प्रयत्न केला तेव्हाच मी ओळखले होते की, प्राचार्य चादगुडकर हेही आता इंदिरा–कॉंग्रेसकडे वळले असणार. त्यामुळे त्यांची मते काय असतील याचा पूर्ण अंदाज मला होता. तथापि त्यानी आपले विचार ज्या ठाशीवपणे आणि वक्तृत्वपूर्ण शैलीने मांडले त्यामुळे मी चकित झालो. प्राचार्य चादगुडकर याची ही मुलाखत लेखाच्या रूपाने यापुढे दिली आहे–

## पांढरपेशे विचारवंत

आणीबाणीपासून इंदिरा गांधी आणि शहरातील तथाकथित विचारवंत याच्यात दुरावा निर्माण झाला आहे. एक्काहत्तरच्या निवडणुकात हे विचारवंत इंदिरा गाधीना पाठिंबा देत होते, धारियाचा प्रचार करणारी पत्रके काढीत होते, कॉंग्रेसतर्फे भरणाऱ्या मेळाव्यातून व्यासपीठावर मिरवीत होते. बडी आघाडी ही भाडवलदाराच्या बगलबच्च्याची आहे, प्रतिगाम्यांचा तो बालेकिल्ला आहे असेही कंठरवाने सागत होते. खरे पाहता ६९ साली इंदिराबाईंनी कॉंग्रेसच्या जुन्या नेत्याशी ज्या निर्दयपद्धतीने सामना केला आणि साधनांच्या पावित्र्याचा विचारही मनात न आणता लोकप्रतिनिधी आपल्याकडे वळले, ते पाहता बाईंच्या राजकारणाची पारख त्यांना व्हायला हवी होती. जर ७१ साली हे विचारवत चुकले असे आपण मानत असू तर आज बाईंवर सरसकट आरोप करतानाही ते चुकत नसतील कशावरून?

राजकारणी माणूस हा या 'विचारवंता'प्रमाणे आदर्शात गुतून रहात नाही. त्याला कठोर वस्तुस्थितीशी लढत द्यावयाची असते. लोकशाहीची पश्चिमी कल्पना आदर्श म्हणून अवश्य डोळ्यासमोर हवी; पण या भूमीत तिचा वापर करताना काही तडजोडी कराव्या लागणार हेही विसरू नये. खुद्द तुमचे हे विचारवंत अगदी साध्या गोष्टीसाठी आदर्श धाब्यावर बसवतातच की नाही? आपल्या कंपूतल्या व्यक्तीचे लेख छापून आणावेत, त्याची स्वतःहून पत्रे लिहून भलामण करावी, विरुद्ध कपूला अनुल्लेखाने मारावे हे सर्व डावपेच या विचारवंतांनी आजवर वापरले आहेतच ना? आता यांचे जग ओंजळी एवढे आणि बाईंचे गगनाएवढे म्हणून दोघाच्या दोषात आकारमानाचा काय तो फरक पडला इतकेच. बाईंवर हुकूमशाहीचा किंवा राजनैतिक संकेत धुडकावून लावण्याचा आरोप करण्याचा म्हणूनच याना अधिकार पोचत नाही.

बाईंनी भोवताली गोळा केलेली माणसे भ्रष्टाचारी होती; नीती–अनीतीचा विवेक न पाळणारी होती असे आरोप ही मडळी करतात आणि उदाहरणे म्हणून यशपाल कपूर, ललित–नारायण मिश्र आणि संजय यांची नावे घेतात. परंतु या विद्वानाना हे कळत नाही की, अनुयायी निवडण्याचे नेत्याचे स्वातंत्र्य फार मर्यादित असते. असलेली माणसे चुचकारून त्याच्याकरवी कामे करून घ्यावी लागतात. जेथे चांगल्यात चागली माणसे निवडली जावीत अशी अपेक्षा असते अशा विद्यापीठात आणि महाविद्यालयात तरी काय चालते? जाहिरात दिली पाहिजे अशी सक्ती असताना त्यातून पळवाट म्हणून हे विद्यापीठ–धरंधर जाहिराती आपल्याला हवा तो माणूसच फक्त फिट बसेल अशा अटी घालून लिहितात. या विचारवंतानी बाईंवर सोयरिकीचे आरोप करणे म्हणजे 'नागड्याने उघड्यास हसावे' अशातला प्रकार म्हणावा लागेल.

## वास्तवदृष्टी

तेव्हा सार्वजनिक जीवनातला भ्रष्टाचार

नाकारता कुणालाच येणार नाही. ती एक पाशवी वस्तुस्थिती आहे. कोण्या एका व्यक्तीचा तो दोष नाही. एकट्या इंदिरा गांधीवर भ्रष्टाचाराचा गड्डा असण्याचा आरोप करून झोडपत बसणे ही स्वत:ची फसवणूक होईल. याचा अर्थ बाई भ्रष्टाचारी नसतील असा नव्हे. पण एकदा सगळेच भ्रष्टाचारी आहेत असे म्हटल्यानंतर इंदिराबाई भ्रष्टाचारी आहेत की नाही हा प्रश्न गौण होतो. मुद्दा असा आहे की, भ्रष्टाचार हा कामे झटपट व्हावीत, श्रीमंती लवकर प्राप्त व्हावी, भोगेच्छा दाबून न टाकता ती तृप्त होण्याचे प्रयत्न करावेत या ऊर्मीतून निर्माण होत आहे, अणि ही उपभोगेच्छा विकासाच्या दृष्टीने उपकारक आहे. ही उपभोगेच्छा घातकी आहे, गीतेत वर्णिलेल्या आसुरीसंपत्तीशी तिचे साम्य आहे, असे म्हणणारे म्हणोत; पण तिच्या भोवऱ्यातून कोणी सुटत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे गांधीवादाचे पोवाडे मनाला कुरवाळणारे वाटले तरी त्याप्रमाणे आचरण करण्याचो दृढ इच्छा आता अशक्य आहे.

असे जर असेल, तर या व्यक्तिगत भोगेच्छांची सांगड घालून विकासाचा रथ त्याच्या एकवट शक्तीने त्वरित पुढे ओढला जाईल अशी तरतूद करणे हे देशातल्या धुरिणाचे कर्तव्य ठरते. पण ही गोष्ट खुल्या चर्चेने आणि बहुमताने घडवून आणता येत नाही, हे जनता पक्षाच्या अनुभवावरून आपल्याला कळून चुकले आहे. जनता पक्षाच्या निर्मितीच्या वेळी अशी अपेक्षा होती की, घटक पक्ष परस्पराशी चर्चा करून आणि त्या चर्चेतून आपली मते सुधारून घेऊन प्रत्येक प्रश्नाबाबत निर्णयक्षम बहुमत तयार करू शकतील, पण असे झाले नाही. हाच अनुभव आता कॉंग्रेस–लोकदल याच्या युतीबद्दलही येत आहे. तेव्हा लोकशाहीच्या ज्या प्रक्रिया आपण पाश्चात्त्य जगाकडून शिकलो त्या इथे अपुऱ्या पडत आहेत हे उघड आहे.

पण ही किमया थोड्या फार प्रमाणात जवाहरलाल नेहरूंनी आणि त्यानंतर त्याहून मोठ्या प्रमाणात खुद्द इदिरा गांधीनी करून दाखविली होती. नेहरूंच्या काळी राजकीय जागृती, हक्काची जाणीव आणि उपभोगेच्छेची कक्षा फक्त शहरी सुशिक्षितांपुरती मर्यादित होती त्यामुळे थोडेफार शेतीकडे दुर्लक्ष करून आणि त्या मानाने औद्योगीकरणावर जास्त भर देऊन या पाढरपेशांच्या नोकऱ्या–पगाराची तरतूद आणि त्याचबरोबर देशाचा विकास काही प्रमाणात त्यानी साधला. पण अलीकडे ग्रामीण भागातील कृषिजीवी जातीही आर्थिक-विकासाच्या मागे लागल्या आणि उपभोगेच्छेच्या भोवऱ्यात अडकल्या. हरिजन–गिरिजन आणि आजवर उपेक्षित अशा भटक्या जमातीही विकासातला आपला वाटा मागू लागला म्हणजे नेहरूंनी मर्यादित ठेवलेला प्रश्न बाईंच्या काळी अधिक चिघळला आणि गुतागुतीचा बनला. ६७ सालच्या निवडणुकीत याचा प्रत्यय पहिल्यांदा आला. बाईंना शाबासकी द्यायची ती यासाठी की, स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाने आणि कर्तृत्वाने मिळविलेल्या लोकप्रियतेच्या साहाय्याने त्यानी ग्रामीण भागातील आर्थिक पिपासेतून हरितक्रांतीही घडवून आणली.

तेव्हा जनता पक्षाचे आणि त्यानंतर राज्यावर आलेल्या–कॉंग्रेस–लोकदल युतीचे मूलभूत अपयश देशाच्या उपभोगेच्छाची योग्य सांगड घालण्यातील असमर्थता हे आहे. स्वत:ची ही कमकुवत बाजू झाकण्यासाठी हुकूमशाही विरुद्ध लोकशाही, संसदविरुद्ध मत्रिमंडळ, न्यायालये विरुद्ध सरकार अशी खोटी भांडणे लढवून जनतेचा बुद्धिभेद हे पक्ष करीत आहेत.

## तात्कालिक बाब

येऊन जाऊन तुमचा इंदिरा गाधीवर जबरदस्त चार्ज काय तर त्यानी आणीबाणी लादली. पण हे लक्षात घ्या की, आणीबाणी ही केवळ तात्कालिक घटना होती. बरे; त्यांतही बेकायदेशीर काही नव्हते. आणीबाणी पुकारण्याची तरतूद घटनेत होतीच. ही आणीबाणी इंदिरा गांधी दीर्घकाळ चालवू शकल्या असत्या, किमान विरोधकाचा पुरा बीमोड होईपर्यंत त्या थाबू नक्कीच शकत होत्या. असे असूनही त्यानी पूर्णपणे खुल्या निवडणुका घेतल्या. आता आपण विजयी होऊ अशी खात्री असल्यामुळेच त्यांनी निवडणुका घेतल्या हे म्हणणे अजागळपणाचे आहे. आपला पराभव होईल हे माहीत असताना कोण निवडणुका घेईल?

तेव्हा आणीबाणी हा या निवडणुकीचा मुद्दा होऊच शकत नाही. मुद्दा आहे तो उपभोगेच्छेच्या चक्रात सापडून परस्परांशी स्पर्धा करणाऱ्या गटात विखुरलेला समाज भारतीय घटनेने घालून दिलेल्या साच्यात कसा बसवायचा, हा. हे काम या सर्व गटांवर स्वत:च्या वैयक्तिक लोकप्रियतेचा दबाव आणून तुकडेजोड करण्याची किमया ज्यानी पूर्वी करून दाखविली आहे, अशा नेत्याच्याच हातून होईल हे उघड आहे.

आणीबाणी, मुस्कटदाबी, हुकूमशाही वगैरे कोलाहलातून जरा बाजूला होऊन मी विचार करतो तेव्हा मला वस्तुस्थिती अशी आढळते. म्हणून मी स्वत:तर इंदिरा कॉंग्रेसला मत देणार आहेच, पण आमच्या कॉलेजातल्या सर्व प्राध्यापकांना आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही तसेच करावयास लावणार आहे.

## चांदगुडकरांची परखड मुलाखत

शाबास, चादगुडकर स्वामी, शाबास. मुलाखतवाल्या विद्यावंतांची तुम्ही जी सडेतोड निर्भर्त्सना केली आहे ती ऐकून या बडबडवुवाच्या दोन टोळ्या चतु:शृंगीच्या दोन अंगानी देवळाकडे धावताना दिसत आहेत. धापा टाकताना देखील, निरनिराळ्या कमिट्यांवर आपले किती आणि त्याचे किती याचे हिशेब काटेकोरपणे जमविताना चढणारे या विद्यावंताचे आवाज आम्हाला येथेही ऐकू येत आहेत. राजकीय नेते आणि हे विद्यापीठ धुरंधर यांच्या चारित्र्यात

आणि कार्गेतंत्रांत काडीचाही फरक नसल्याचे कळल्यानंतर या वाचस्पतीच्या पावित्र्याकडे बोट दाखवून राजकारण्याच्या खेळचाचा तिटकारा करणारी सामान्य जनता जागी होईल आणि चालू निवडणुकात अधिक रस घेऊ लागेल असा भरंवसा वाटतो.

समाजातील सर्व गट आता आर्थिक उत्कर्षाच्या मागे लागले आहेत आणि चैन-बाजीला चटावलेल्या उच्चवर्गीयांच्या जीवन शैलीचे आकर्षण सर्व थरात पसरले आहे हे चांदगुडकराचे निरीक्षणही मार्मिक आहे. आपल्या पोळीवर तूप पडावे यासाठी कोण-त्याही मार्गाचा अवलंब करताना सदसद्-विवेकाची टोचणी कोणाला फारसा त्रास आजकाल देत नाही हे सर्वांना माहीतच आहे. सध्याची अस्वस्थता या भोगेच्छाच्या वणव्या-मुळे निर्माण होत आहे हेही खोटे नाही. मात्र या गटवार आकांक्षाची सांगड घालण्यासाठी लोकशाहीच्या प्रक्रिया अपुऱ्या पडत आहेत आणि इंदिरा गांधीसारख्या या सर्व गटांना व्यापून उरणाऱ्या लोकप्रिय नेत्याला सत्ता देणे जरूर आहे हा प्राचार्यांचा दुहेरी सिद्धान्त आम्हाला नामजूर आहे.

### जनता पक्षाचे यश

खरी गोष्ट अशी आहे की, पंडित नेहरू आणि श्रीमती गांधी यांच्या लोकप्रियतेच्या दडपणाखाली, निरनिराळ्या हितसंबंधांची लोकशाही प्रक्रियातून सांगड घालण्याची पद्धत आपल्या राजकारणात रुजलीच नाही. काँग्रेसच्या राज्यात राजकारण चालले ते इतकेच की, निरनिराळे हितसंबंध या दोन नेत्यांना आपल्याकडे झुकविण्याचे प्रयत्न करीत राहिले हे हितसंबंध परस्परासमोर प्रत्यक्ष कधी उभे राहिलेच नाहीत. त्यामुळे भास मात्र असा होत राहिला की, नेहरू अगर इंदिरा गांधी हे त्या हितसंबंधांची सांगड घालीत आहेत.

परंतु विकासाची तहान जसजशी वाढत गेली आणि समाजातले निरनिराळे गट तुट-पुंज्या विकासाचा अधिकाधिक वाटा मिळण्यासाठी झगडू लागले तसतशी या नेत्यांची लोकप्रियताही त्या झगड्यांना आळा घालू शकेना. ७३–७४ साली श्रीमती गांधी स्वतःच्या लोकप्रियतेचा दबाव आणून रेल्वेचा संप मिटवू शकल्या नाहीत, किंवा तत्पूर्वीची गव्हाची एकाधिकार खरेदी योजनाही यशस्वी करू शकल्या नाहीत हे आपण पाहिलेच आहे. तेव्हा लोकशाही प्रक्रिया आपल्याकडे अपुऱ्या पडल्या असे म्हणताना इंदिरा गांधींची लोकप्रियताही परीक्षेच्या क्षणाला तोटकी पडली हे विसरून चालणार नाही.

निरनिराळ्या गटाच्या परस्परविरोधी हितसंबंधाना स्वतःची बाजू पुनः पुन्हा माडू देऊन त्याचा निरास करण्याचा पहिला प्रयत्न जनता पक्षाने केला. बोनसचा प्रश्न, सक्तीच्या बचत योजनेचा प्रश्न, अन्नधान्याचे किमान भाव ठरविण्याचा प्रश्न हे सर्व गुतागुतीचे प्रश्न दडपशाहीचा उघड किंवा अंतस्थ उपयोग न करता जनता पक्षाने सोडविले. पक्षातील वादविवाद विभूतिप्रधान नेत्याच्या लोकप्रियतेच्या वरवंट्याखाली रगडून न टाकता त्यांच्या प्रसिद्धीला पूर्ण मोकळीक दिली. हे सर्व एका श्रद्धेतून कर-ण्यात आले. सार्वजनिक जीवनात उघड वाद-विवादातून सर्व हितसंबंध सामंजस्य साधू शकतात, ही ती श्रद्धा होय.

त्यातून आणीबाणीच्या अनुभवानंतर तर समाजातील फार मोठ्या आणि वजनदार वर्गाचा श्रीमती गांधीवरील विश्वास पूर्णपणे नाहीसा झाला आहे. तेव्हा पूर्वी कधी इंदिरा गांधी आपल्या लोकप्रियतेच्या बळावर हित-संबंधी गोटाना आळा घालू शकल्या होत्या असे क्षणभर मानले तरी, यापुढे त्या तसे करू शकतील यावर अजिबात विश्वास बसत नाही. विविध गटाच्या स्वार्थांची सांगड यापुढे लोकशाही प्रक्रियाचा आश्रय करूनच घालावी लागणार. अशा स्थितीत, जनता पक्षाचे आजवरचे यश मर्यादित आहे हे मान्य करूनही, त्या पक्षाला पर्याय नाही हे स्पष्ट आहे. □


**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**

**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

**लेखक : वि. ग. कानिटकर**

**आवृत्ती : तिसरी (सचित्र)**

**किंमत : रुपये पंचेचाळीस**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# केंद्रस्थानी हवे असे समतोल विचारांचे ज्येष्ठ जनता नेते श्री. नानासाहेब गोरे

आ. ग. प्र. प्रधान

काही व्यक्तींना परिस्थितीशी सतत झगडावे लागते, तर काही थोड्या व्यक्ती सुखी, सुरक्षित जीवन जगण्याची शक्यता असताही ती चाकोरी सोडून संघर्षमय जीवन स्वतःहून स्वीकारतात. श्री. नानासाहेब गोरे हे या दुसऱ्या वर्गातील दुर्मिळ व्यक्तींपैकी आहेत. नानासाहेबांचे वडील शिक्षण खात्यात नोकरीस होते. सुखवस्तू मध्यमवर्गीय कुटुंबातल्या या एकुलत्या एक मुलाला परिस्थितीची झळ लागण्याची शक्यता नव्हती. सुदृढ शरीर, कुशाग्र बुद्धी, हीही वाट्याला आलेली, त्यामुळे उत्तम अभ्यास करावा खोखो, हुतूतू आदी खेळ खेळावे. समवयस्क मित्राच्या सहवासात रमावे असे विद्यार्थी–दशेतील जीवन चालू होते, घरची शिस्त कठोर असली तरी मायेची शीतल सावली सतत लाभली होती. पण मन शाळेच्या चार भिंतीत सामावणारे नव्हते. बुद्धीला पंख फुटत होते. कॉलेजात गेल्यावर देशाच्या परिस्थितीचे भान होऊ लागले. अभ्यास करतानाच नव्या जगातील विचाराशी ओळख झाली. मन अनेक प्रश्न स्वत.लाच करू लागले, वृत्ती काव्यात्म, सौंदर्यप्रेमी, पण तरीही हा तरुण सुखासीनतेकडे वळण्याऐवजी संघर्षाकडे झुकला. कारण पराक्रम करण्याची परिस्थितीचे आव्हान स्वीकारण्याची त्याच्या युयुत्सु मनाला ओढ वाटू लागली. पारतंत्र्याच्या बेड्या तोडल्या पाहिजेत, यासाठी हात शिवशिवू लागले. स्वातंत्र्य समरात उडी घेण्याचा निर्धार झाला आणि इंग्रजी साहित्य हा विषय घेऊन ऑनर्स घेतलेला हा तरुण यूथ लीगमध्ये तडफेने काम करू लागला. एस्. एम्. जोशी, 'शरूभाऊ लिमये, र. के. खाडिलकर हे त्याचे सहाध्यायी स्वातंत्र्यसमरातही त्याच्या समवेत होते.

'१९३० साली पहिली तुरुंगवासाची शिक्षा झाली, आणि गेल्या पाच दशकात संघर्ष कधी थांबलाच नाही. ऐन विशीत जो उत्साह होता तोच सत्तरी उलटली तरी अद्याप कायम आहे. मन प्रगल्भ झाले, पण मनाचा ताजेपणा यत्किंचितही कमी झालेला नाही. कृतिशील खडतर जीवन जगतानाही ज्ञानोपासना कधी थांबली नाही. त्यामुळे बुद्धीचे पाते आजही लखलखीत आहे, सार्वजनिक काम करताना उपेक्षितांच्या दुःखमय जीवनाचे जे दर्शन झाले त्यामुळे सहानुभूती व्यापक झाली आणि सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित होईपर्यंत थांबवता येणार नाही, या जाणिवेमुळे आजही अविरत धडपड चालू आहे. या वृत्तीमुळे अनेक तरुणांशी आयुष्यात संबंध आले, स्नेह जमला आणि आजही तरुण पिढीशी चटकन नाते जुळत आहे. जीवनात अनेक सुखदुःखे भोगली, उन्हाळे पावसाळे सोसले. रसिकतेने कलांचा आस्वाद घेतला, उत्तम साहित्य लिहिले. वक्तृत्वाने सभा जिंकल्या. संसदेत कर्तृत्वाचा ठसा उमटवला. इंग्लंडमध्ये राजदूत म्हणून देशाची इभ्रत वाढवली. खडतर कष्टमय अनुभव घेतले, त्याचप्रमाणे मानसन्मानही मिळवले. लोकप्रियता लाभली आणि अनेकदा स्पष्ट वक्तेपणामुळे, स्पष्ट परखड भूमिकेमुळे अप्रियताही सोसावी लागली. मुलीचा सुखी संसार पहायला मिळाला. पण त्याचबरोबर आयुष्यभर साथ देणाऱ्या सुमतीबाईंच्या मृत्यूचा आघातही सोसावा लागला.

तरुण वयात स्वतंत्र भारताचे जे स्वप्न मनाला पडले होते ते स्वप्न साकार झाले. गोवा मुक्ती संग्रामात समर्पण भावनेने उडी घेतली आणि गोवा मुक्त झाला. संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला आणि मायमराठीला राजभाषा म्हणून वैभवाचे स्थान मिळाले या स्वप्नाची पूर्तता झाली, पण लोकशाही समाजवादी समाजरचनेचे ध्येय अद्याप साध्य झालेले नाही. देशात कमालीची विषमता आहे, दारिद्र्य आहे, उपासमार आहे. अन्याय आहे. क्रौर्य आहे, दलिताच्या जीवनाची ससेहोलपट अद्यापही चालू आहे. मध्यंतरी लोकशाहीला ग्रहण लागले होते. ते सुटले, पण नवा मांडलेला डाव पुन्हा उधळला गेला. आलेल्या परिस्थितीच्या प्रत्येक आव्हानाला नानासाहेब डोळसपणे सामोरे गेले. आता तशी कसलीच अपेक्षा वा आसक्ती उरलेली नाही. पण कर्तव्यबुद्धी स्वस्थ बसू देत नाही म्हणून नानासाहेब आजही धडपड करीत आहेत. मित्राशी मतभेद झाले की हे व्यथित होतात. पण भावबंधापेक्षा वैचारिक निष्ठेचे महत्त्व त्यांना अधिक वाटते. वाटचाल चालू आहे. पल्ला दूरचा आहे. काही स्वप्ने अधुरी राहिली आहेत म्हणून पायात जोम आहे. बुद्धीत झेप आहे, मनात चैतन्य आहे तोपर्यंत या पथिकाची भ्रमन्ती चालूच राहणार आहे.

१९३०, ३२ व ४२ चे स्वातंत्र्य लढे, हैद्राबाद लढा आणि गोवा मुक्ती आंदोलन यामध्ये श्री. नानासाहेब गोरे यानी दहा वर्षांहून अधिक काळ तुरुंगवास सोसला आहे. १९३० साली तुरुंगात त्यांनी चक्की पिसली आहे. हैद्राबाद संस्थानात केलेल्या एका भाषणाबद्दल नानासाहेबांना १९४० साली अटक व शिक्षा झाली. तेथून सुटका होताच, पोलिसाना चुकवून १९४२ च्या भूमिगत चळवळीत सहकाऱ्यांना ते येऊन मिळाले. सानेगुरुजी याच्याबरोबर मुंबईत 'मूषक महाल' या भूमिगतांच्या निवासस्थानी त्यांना अटक झाली आणि १९४६ मध्ये ते सुटले. जवळ जवळ सहा वर्षांनी घरी परत

आलेल्या नानासाहेबाची भेट झाल्यावर त्यांच्या मातापित्यांना आणि सुमतीबाईंना काय वाटले असेल हे सहृदय व्यक्तीच जाणू शकतील. गोवा मुक्ती संग्रामात सत्याग्रहाचे नेतृत्व केल्यावर पोर्तुगीज पोलिसांनी नानासाहेबांना निर्घृण मारहाण केली आणि पुढे लष्करी कोर्टापुढे खटला चालून त्यांना व शिरूभाऊ लिमयाना शिक्षा ठोठावण्यात आली. त्या वेळी नानासाहेबाच्या आई-वडलाना भेटावयास श्री. एस्. एम्. जोशीच्या समवेत मी गेलो होतो, तेव्हा नानासाहेबांच्या वृद्ध आईच्या डोळ्याचे पाणी खळत नव्हते. वडील रुद्धकंठाने म्हणाले, ' मी हिला सांगतोय, आपलं आता काशीला जाण्याचं वय. आपल्याऐवजी नानू काशीला गेलाय असं समज ! '

तुरुंगात व बाहेरही नानासाहेबांचे वाचन अखंडपणे चालू असे व अद्यापही ते चालू आहे. १९३०–३२ साली मार्क्सचे विचार वाचून ते समाजवादी झाले. आणि तुरुंगातून सुटल्यावर १९३४ साली आचार्य नरेन्द्र देव, जयप्रकाश नारायण, डॉ. लोहिया, युसुफ मेहेरअल्ली, अच्युत पटवर्धन, एस्. एम्. जोशी आदींच्या बरोबर कॉंग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना करण्यात पुढाकार घेतला. तेव्हापासून आजवर समाजवादी चळवळीत नानासाहेब सतत आघाडीवर राहिले आहेत. भाषणातून व लेखनातून त्यांनी गेली ४५ वर्षे अनेकांच्या मनावर समाजवादाचा संस्कार केला आहे.

नानासाहेबांनी विचारप्रधान लेखन विपुल केले आहे. पंडित नेहरूंच्या आत्मचरित्राचा त्यानी केलेला अनुवाद वाचला त्यावेळी पं. नेहरूंचे व्यक्तिमत्त्व व विचार याबरोबरच नानासाहेबांच्या रसाळ, सुबोध मराठी शैलीचाही वाचकांवर प्रभाव पडला. नानासाहेबांनी लिहिलेला अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा इतिहास वाचल्यावर त्यांच्या गाढ व्यासंगाची कल्पना येऊ शकेल. विचारप्रधान लेखनाप्रमाणेच नानासाहेबांनी ललित लेखनही विपुल केले आहे. ' कारागृहाच्या भिंती ' ' सीतेचे पोहे ' ' डाली ' आदी पुस्तकांना रसिक वाचक व चोखंदळ टीकाकार याची मान्यता लाभली आहे मुलांसाठी लिहिलेली करवंदे, बेडूकवाडी, चिमूताई घर बांधतात ही पुस्तके अत्यंत हृदयंगम आहेत. ' ऐरणीवरील प्रश्न ' सारख्या पुस्तकात त्यांचे वैचारिक लेख आहेत तर 'शंख आणि शिंपले' मध्ये संस्मरणे आहेत.

साहित्यनिर्मितीप्रमाणेच नानासाहेब हे उत्तम चित्रे काढतात. हे त्यांच्या निकटच्या मित्रांनाच माहीत आहे. निसर्गावर त्यांचे अमाप प्रेम आहे. गोव्यातील आग्वादच्या तुरुंगातून लिहिलेल्या एका पत्रात त्यानी कोठडीतून दिसणाऱ्या समुद्राच्या विविध छटांचे मोजक्या शब्दात जे वर्णन केले होते ते अनुपम होते, त्यांचे एक पत्र सचित्रही होते.

नानासाहेबांची लेखनाची व भाषणाची शैली, सुबोध, सहज, ठसकेबाज आणि बाधेसूद आहे वाचकांच्या व श्रोत्यांच्या बरोबर ते सहजतेने संवाद साधतात आणि मधूनच नर्म विनोद करीत, प्रतिपक्षावर प्रहार करीत ते स्वत:चा विचार प्रभावीपणे मांडतात. हे सर्व साधण्यासाठी नानासाहेबानी खूप श्रम केले आहेत, अद्यापही ते करतात. यासाठी त्यांनी स्वत:च्या जीवनाला एक शिस्त लावून घेतली आहे. उगाच गप्पाष्टकांत वेळ घालवणे त्यांना रुचत नाही. त्यांची सहानुभूती कधी भाबडी भावुक नसते. उद्दिष्टाशी सुसंगत कृती झालीच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असतो आधुनिक विज्ञानातून ही विज्ञाननिष्ठा आपल्या समाजात आली पाहिजे, असा त्यांचा सतत आग्रह असतो.

राजकारणात नानासाहेब हे आजवर सतत विरोधी पक्षातच राहिले. १९५७ साली लोकसभेत निवडून गेल्यावर खंबीर, पण विधायक विरोधी पक्षसदस्य म्हणून त्याना मान्यता मिळाली. १९७० साली ते राज्यसभेवर निवडून गेले. आणीबाणी पुकारली गेल्यावर अनेक विरोधी पक्षनेते पकडले गेले. तेव्हा नानासाहेबानी राज्यसभेत इंदिरा गांधींच्या जुलमी राजवटीवर प्रखर शरसंधान केले. देशभर दौरा काढून लोकाना निर्भय केले हुकूमशाहीला तोंड देण्यासाठी सर्व लोकशाहीवादी विरोधी पक्षांची एकजूट व्हावयास हवी हे पटल्यावर त्यासाठी सतत व विविध प्रयत्न करून जनता पक्षाच्या निर्मितीत पुढाकार घेतला. नंतर भारताचे इंग्लंडमधील उच्च आयुक्त म्हणून जबाबदारी स्वीकारली; पण देशात राजकीय परिस्थिती अस्थिर झाल्यावर ते परत आले उच्चायुक्तपदाचा राजीनामा देऊन ते पुनश्च राजकारणाच्या आखाड्यात उतरले आणि भारताचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी जनता पक्ष टिकवला पाहिजे, अंतर्गत मतभेदांवर मात केली पाहिजे, अशी खंबीर भूमिका त्यांनी घेतली.

लोकशाही, समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता ही जनता पक्षाची तीन सूत्रे. नानासाहेब गोऱ्याचीही तीच जीवननिष्ठा. त्यामुळे जनता पक्षाचे एक ज्येष्ठ नेते म्हणून त्यांना लोकसभा निवडणुकीत जनता पक्षाने उभे केले आहे. नानासाहेबाचे सर्वच विचार न पटणाऱ्या अनेक व्यक्तींनीही त्याना पाठिंबा दिला आहे. कारण आजच्या तत्त्वशून्य गोंधळाच्या राजकारणात त्यांच्यासारखे समतोल विचारांचे ज्येष्ठ नेते केंद्रस्थानी असावेत असे सर्वांनाच वाटते. आगामी लोकसभा निवडणुकीत पुण्यातील नागरिक नानासाहेबांच्याबद्दल त्यांना वाटणारा आदर व विश्वास, त्यांना भरघोस मते देऊन व्यक्त करतील अशी खात्री वाटते. ☐

# रामभाऊ म्हाळगी : आश्वासनपूर्तीचे दमदार पाऊल

**जनता पक्ष फुटेल, जनता सरकार कोसळेल अशी पुसटशी शंकाही जेव्हा कुणाला येत नव्हती तेव्हापासून रामभाऊ म्हाळगी आपल्या ठाणे मतदार संघाला आपण केलेल्या कामाचा आढावा वरचेवर कर्तव्यभावनेने सादर करीत होते. हा त्यांनी दुसऱ्या वर्षाच्या शेवटी म्हणजे मार्च १९७९ मध्ये आपल्या मतदारांसमोर ठेवलेला कामाचा आढावा. अशा कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधीला कोण याही निवडणुकीत पुन्हा विजयी करणार नाही ? रामभाऊ आल्यासारखेच आहेत--कारण हे एक खणखणीत वाजणारे नाणे आहे........**

१९७७ मधील लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या आणि जनता पार्टीतर्फे ठाणे मतदार संघातून रामभाऊ म्हाळगींची उमेदवारी घोषित झाली होती. त्यावेळी 'ते येथे उमेदवार म्हणून येणार हे आधी माहीत असते तर रामभाऊ As a Legislator हे शंभरपानी पुस्तक मी लिहून काढले असते.' असे सहजस्फूर्त गौरवपूर्ण उद्गार महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ राजकीय नेते व विचारवंत श्री दत्ता ताम्हणे यानी काढले होते. दत्ताजीनी त्यांच्या संसदपटुत्वाबद्दल व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरावा असाच रामभाऊंचा गेल्या दोन वर्षातील 'खासदार' म्हणून व्यवहार आहे.

गेल्या वर्षाच्या तुलनेने या दुसऱ्या वार्षिक अहवालात सागण्यासारखे बरेच काही आहे. खासदारांच्या मदतीला या मतदारसंघातून पाच आमदारही आता लाभले आहेत. सर्वश्री ग मो. कोळी, गौतम पोशा भोईर, जगन्नाथ पाटील, राम कापसे व सीतलदास हरचंदानी हे पाच आमदार. श्री भगवानराव जोशी, श्री. श्रीपाद पटवारी व श्री. प्रल्हाद अडवानी हे नगराध्यक्ष व अनेक पंच सरपंच आपआपल्या क्षेत्रात कार्यरत असल्याने साहजिकच आपल्या खासदाराना अधिक वेळ व अभ्यासासाठी उसंत केंद्र शासनाशी संबंधित असलेल्या विषयासाठी मिळत गेला. त्यामुळे हाती घेतलेल्या प्रश्नाना यश आले.

### मतदारसंघाचे संवर्धन

लोकसभेतील आपले कर्तव्य काटेकोरपणे पार पाडण्यासाठी मतदार संघाची देखभाल कशी करावी याचा चालता बोलता आदर्शच आपल्या खासदारानी निर्माण करून ठेवला आहे. मतदार संघाशी नित्य संपर्क हा त्याचा खास विशेष. त्यासाठी गाठी-भेटी, चर्चा, मेळावे, प्रश्न समजावून घेणे, हे गेली दोन वर्षं अव्याहतपणे चालू होते. लोकसभेचे अधिवेशन व इतर समित्याची कामे या व्यापातून वेळ काढून महिन्यातून किमान सहा-सात दिवस मतदाराच्या सहवासात घालविणे ही बाब आता सर्वांच्या परिचयाची झाली आहे. श्रमजीवी, उपेक्षित दलित व दुर्बल घटकांच्या वस्तीना भेटी देऊन त्यांच्या सुखदु:खाचा अनुभव घेणे, त्यांचे प्रश्न जवळून पाहणे व त्याचे मनोगत जाणून घेणे याला रामभाऊंनी अधिक प्राधान्य दिले. या वर्षभराच्या काळात कुळगाव येथील गांधीनगर वस्ती, डोंबिवली येथील हरिजन कॉलनी, संतनगर वस्ती, चर्मकार वसाहत, कल्याण येथील रोहिदास वाडा, ठाणे येथील पाचपाखाडी व वागळे इस्टेट या वस्त्याना भेटी देऊन जी जवळीक साधली आणि त्यामुळे त्या गोरगरिबाच्या चेहऱ्यावर जे कृतज्ञतेचे भाव उमटले ते मुद्दाम नमूद करावे असेच आहेत. 'निवडून आल्यानंतर आमची आठवण ठेवून आमच्याकडे येणारा हा पहिलाच खासदार !' ही कृतज्ञतेची पावती म्हणजे 'जागरूक व कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधीत्वाचा' बहुमानच म्हणायला हवा.

### विरोधी पक्षीयांशी भेटीगाठी

या काळात मतदार संघातील त्या त्या भागातील विरोधी पक्षांच्या नेत्याकडे जाऊन गाठी-भेटी घेण्याचा उपक्रम करण्यात आला. यामुळे राजकीय पक्षातील अनावश्यक दुरावा नाहीसा होऊन व पक्षभिनिवेश सोडून कामे करता येतात अशी रामभाऊंची धारणा आहे. डोंबिवली, अंबरनाथ, शहापूर, कल्याण आदी ठिकाणी असे उपक्रम झाले. दोन्ही कॉंग्रेस, रिपब्लिकन, शिवसेना इ. पक्ष नेत्यांची त्यांनी भेट घेतली. ठाण्याचे नगराध्यक्ष श्री. सतीश प्रधान, अंबरनाथचे नगराध्यक्ष श्री. प्रभाकर नलावडे याच्याशी प्रसंगानुरूप होणाऱ्या भेटी व पत्रव्यवहार ह्या त्या मनमोकळ्या विश्वासाच्याच द्योतक आहेत. वाढता जनसंपर्क ही आता नित्य परिपाठीच झाली आहे. वेगवेगळ्या सघटना व गटाना एकत्रित करून त्यांच्याशी झालेला संवाद हा कार्याला उपकारक ठरतो व प्रश्न मार्गी लागण्यास त्याने चालना मिळते हा अनुभव अनेकाना आला आहे. छोटे उद्योजक, प्रवासी संघटना, माजी सैनिक, विमाधारक याच्या प्रतिनिधीबरोबर झालेल्या बैठकी व चर्चा यातून अनेक छोट्या–मोठ्या तक्रारी दूर होण्याचे कामी यश आले. माजी सैनिकांच्या प्रश्नाला चांगली चालना मिळाली.

## ठाण्याची लघु उद्योजक परिषद

ठाणे मतदार संघ, किंबहुना ठाणे जिल्हा हा परस्पर विरोधी व अनेक गुतागुतीच्या प्रश्नानी व्यापलेला महत्त्वाचा जिल्हा आहे हे मतदार संघाचे वैशिष्ट्य व लघु-उद्योगाचे पसरलेले जाळे ध्यानी घेऊन ठाण्यात भरलेली लघु-उद्योजकाची परिषद ही दुसऱ्या वर्षातील कामगिरी उल्लेखनीय बाब म्हणावी लागेल. रामभाऊंच्या पुढाकाराने मंत्री व उत्पादक याच्यातील प्रत्यक्ष सुसंवाद हा त्या कामगिरीतील मानाचा तुरा होय. ठाणे जिल्ह्याच्या लघु-उद्योजकांचे मजबूत सघटन श्री. मधुसुदन खाबेटे याच्या विधायक नेतृत्वाखाली उभे झाले आहे. ठाणे, कल्याण, अंबरनाथ, उल्हासनगर, बदलापूर, वसई, भिवंडी, विरार, डहाणू आदि जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून सुमारे ५०० लघु-उत्तेजक परिषदेस उपस्थितीत राहिले हे त्या विधायक नेतृत्वाचे यश आहे. जॉर्ज फर्नांडीस हे जातीने उपस्थित राहिले होते. राज्याचे उद्योगमंत्री श्री. सुदरराव सोळंके व मंजुरमंत्री सुशिलकुमार शिंदे यानीही आवर्जून उपस्थित राहून परिषदेत मार्गदर्शन केले. लघु-उद्योजकानी अभ्यासपूर्वक तयार केलेली, कच्च्या मालाचा पुरवठा, वित्त सहाय्य, बाजारपेठा, आयात निर्यात, परिवहन, वीज-पाणीटंचाई या महत्त्वाच्या विषयावरील निवेदने सादर करण्यात आली. केन्द्रीय उद्योगमंत्री व व राज्याच्या मंत्रीद्वयांनी याबाबतीत जे काही करता येईल ते करण्याचे आश्वासन परिषदेत दिले. त्याचा पाठपुरावा खासदार श्री. रामभाऊ म्हाळगी व त्याचे आमदार सहकारी आपापल्या परीने करीत राहिले.

## शेतकरी परिषद

लघु उद्योग व शेती यांचा विकास हा नव्या जनता युगाचा मंत्र आहे. 'काळ्या आई'ची मशागत करणारा शेतकरी हा भारताचा मानबिंदू आहे. तेव्हा त्याच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही ही रामभाऊंची स्पष्ट भूमिका आहे. वाडा येथे त्यांच्या अध्यक्षतेखाली ७८ च्या आक्टोबरात झालेली भात उत्पादकांची शेतकरी परिषद अशीच महत्त्वपूर्ण ठरली. ठाणे जिल्ह्यातील वाडे, भिवंडी, मुरबाड, मोखाडा, वसई, पालघर, डहाणू, तलासरी आदि तालुक्यातुन सुमारे ८०० शेतकरी त्यास उपस्थित होते, गाजावाजा, भाषणबाजी, प्रसिद्धी यापासून दूर राहून प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या मुखातून व्यक्त झालेले अनुभव ऐकण्याची संधी खासदाराच्या योजकतेमुळे मिळाल्याने परिषद अपेक्षेबाहेर यशस्वी झाली. 'भाताला शासनाने ठरवून दिलेला ८५ पैसे किलो हा भाव कागदाच्या रद्दीभावापेक्षाही कमी आहे. निरूपयोगी रद्दीलाही १ ते १।। रु. किलो भाव मिळतो !' हा एका निरक्षर शेतकऱ्याने परिषदेत सागितलेला अनुभव हृदयाला भिडणाराच होता. शेतकऱ्याना अधिक भाव मिळावे, जोडधदा उपलब्ध होण्यासाठी आर्थिक साहाय्य व्हावे, छोटचा सिंचन योजनांचे जाळे निर्माण करावे इत्यादी शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या विषयांवर ठराव संमत करण्यात आले. कुळगाव येथे झालेली शेतकऱ्याची 'बेडूक परिषद'ही सर्व दृष्टीने अशीच सरस ठरली. परिषदेत संमत झालेल्या ठरावाच्या आधारे त्याच्या प्रश्नांचा पाठपुरावा लोकसभेत रामभाऊंनी केला. केंद्र पातळीवरील शेती संबंधित समितीवर भात-उत्पादक तज्ज्ञ शेतकऱ्याला प्रतिनिधित्व मिळावे असाही त्याचा प्रयत्न राहीला.

*ठाणे मतदार संघातील अनेक ग्रामपंचायतींच्या या वर्षी निवडणुका* झाल्या आणि जनता पक्षाचे नवीन तरुण व तडफदार कार्यकर्ते निवडून आले. या उसळत्या उत्साहाला रामभाऊंच्या प्रेरक नेतृत्वाची जोड मिळाल्याने ही युवाशक्ती तृप्त आहे. सर्वांची भेट घेऊन त्याचे अभिनंदन करणे, त्याना नव्या योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रोत्साहन देणे, त्याच्याशी पत्रव्यवहार करणे हे घड्याळाच्या काटचाप्रमाणे चालू राहील. ठाणे, मुरबाड, शहापूर तालुक्यात ग्रामपंचायत सदस्याच्या झालेल्या बैठकी प्रेरणादायी ठरल्या. ग्रामपचायतीत निवडून आलेल्या मंडळीनी ठराविक काळात 'ग्रामसभा' भरवून आपल्या कार्याचा अहवाल ग्रामस्थाना द्यावा हा सल्ला रामभाऊंनी दिला आहे. काही ग्रामसभाना स्वतः उपस्थित राहण्याचा मानसही त्यानी बोलून दाखविला.

## धरणग्रस्तांचे गाऱ्हाणे

शहापूर तालुक्यातील भातसा प्रकल्पामध्ये बुडालेल्या सात गावातील सुमारे ४०० शेतकऱ्यानी शहापूर तहसीलदार कचेरीसमोर ४८ तासाचे धरणे धरण्याचा कार्यक्रम अन्य पक्षातर्फे योजलेला होता. पण प्रश्न जनतेचा होता. आणि लोकप्रतिनिधी म्हटला की त्याने राजकीय अस्पृश्यता वर्ज्य मानली पाहिजे ही रामभाऊंची धारणा आहे त्याला अनुसरून त्याच्या सामोरी ते गेले, संबधित अधिकाऱ्याची भेट घेतली. आणि विस्थापिताना काम देण्याची व्यवस्था होऊ शकली.

ठाणे मतदारसंघात सुमारे ३५० खेडी.त्या खेड्याशी सततचा संपर्क या गोष्टीला सहाजिकच प्राधान्य मिळते. पण याचा अर्थ शहराकडे दुर्लक्ष असाही नाही. नागरीकरणाच्या अनंत समस्या या मतदारसघास भेडसावत आहेत. याची जाणीव ठेवून नगरसेवक, कार्यकर्ते, शासकीय अधिकारी याच्याशी नित्य संपर्क त्यानी ठेवला. पालिकेतील जनता पक्षाच्या नगरसेवकाच्या बैठकीतून त्याचे मार्गदर्शन लाभतेच. परंतु याचा पक्षाबाहेर विस्तार करूनही कल्याण व डोंबिवली येथे सर्व पक्षाच्या नगरसेवकाच्या बैठका योजण्यात आल्या होत्या. या बैठकीत जनहिताची कामे राजकारणनिरपेक्ष भूमिकेतून एकजुटीने करण्यावर त्यांनी दिलेला भर सर्वमान्य झालेला दिसला. अंबरनाथ पालिकेत जनता पक्ष सत्तारूढ नाही. पण तेथेही तत्परतेने धावून जाण्याची रामभाऊंची गती मुळीसुद्धा मदावली नाही. 'आपले खासदार श्री. रामभाऊ म्हाळगी यानी रेल्वे ओव्हर ब्रिज बाबतीत नगरपालिकेला सहकार्य देऊन हा प्रश्न सोडविण्यास मदत केली आहे हे विशेष नमूद करावेसे वाटते' *अंबरनाथचे नगराध्यक्ष* श्री. प्रभाकर नलावडे यानी आपल्या मनमोकळ्या मुलाखतीत वर दिलेले प्राजल प्रशस्तीपत्रक हे त्यादृष्टीने पुरेसे बोलके आहे.

सामाजिक संचार व त्याद्वारा वैयक्तिक व सामूहिक भेटीतून जनसामान्याच्या सुखदःखाशी समरस होणे हे एक सामाजिक दायित्व मानतात. त्यादृष्टीने त्यांचा व्यवहार असतो. भेट होणे शक्य नसेल तर पत्ररूपाने दिलासा देण्यास ते मुळीसुद्धा चुकत नाहीत. हाच कटाक्ष सामाजिक सोहाळे व उत्सव याप्रसगीही दिसून येतो. डोंबिवलीमधील दाक्षिणात्याचा पोंगल समारंभ, ठाण्यातील नामदेव सप्ताह, ठाण्यात भरलेले अखिल भारतीय योग सम्मेलन, उल्हास-

नगरमधील सिंधी साहित्य परिषद, कल्याण बँकेचा वार्षिक उत्सव या समारंभाना ते आवर्जून उपस्थित राहिले; आणि कार्यक्रम रेखीवपणे पार पाडल्याबद्दल कार्यकर्त्यांची पाठ थोपटली.

## अभिनव तिळगुळ समारंभ

सार्वजनिक गणेशोत्सवांना भेटी देऊन, त्या ठिकाणच्या कार्यकर्त्यांची विचारपूस करण्याची प्रथा रामभाऊंनी विधानसभा सदस्य होते तेव्हापासून चालू केलेली आहे. खासदार झाल्यानतरही त्यात खड पडलेला नाही कुळगांव, अंबरनाथ, उल्हासनगर, कल्याण, डोंबिवली, ठाणे येथे यंदाही अशा भेटी देण्याचे कार्यक्रम झालेच परंतु त्याच्याच जोडीला संक्रातीचा तिळगुळ देण्याचा उपक्रमही त्यांनी यदापासून सुरू केला आहे. त्यासाठी त्यानी झोपडपट्टी निवासातील, उपेक्षित बाधवाची निवड करून समाजातील स्नेहभाव वृद्धीगत करण्यासाठी मोलाचा हातभार लावला. ठाणे, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर येथील १० झोपडपट्ट्यातून सुमारे तीन हजार स्त्री–पुरुष–बालके यांना तिळगुळ देऊन त्याच्याशी केलेले मनमोकळे हितगुज आपुलकी निर्माण करणारे ठरले. 'ज्याच्या घरात अजिबात चूल पेटत नाही त्याच्या घरात ती रोज कशी पेटेल याची जबावदारी जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सामाजिक दायित्व या नात्याने घेतली पाहिजे,' हे ठिकठिकाणी त्यानी केलेले आवाहन समाजाशी जवळीक निर्माण करणारे होते. असे हे जनसंपर्काचे अनेक हृद्य प्रसंग सर्वांनाच अविस्मरणीय झाले. समाजाला एका स्नेह–सूत्रात गुफून त्याद्वारा कार्याचे डोगर उभे करण्याची ग्वाही देणाऱ्या अशा प्रसंगातून कार्यकर्त्यांचा सच तयार होत गेला. लोकशाही सदृढ पायावर उभी करायची असेल तर समाज बांधणी केली पाहिजे हा विचार त्यात अनुस्यूत आहे.

लोकशाहीची चक्रे संथगतीने फिरत असतात. परंतु त्यातूनच समाजाची लोकहितैषी कामे पुढे रेटली जातात. हे एका व्यक्तीचे काम नाही याची रामभाऊंना जाणीव आहे. सर्वांना बरोबर घेऊन जाण्यामुळे गेल्या दोन वर्षांत केलेल्या चिकाटीच्या प्रयत्नांना आता कुठे फळे येऊ लागली आहेत. लोकसभेच्या सर्वोच्च व्यासपीठावर त्यानी माडलेले प्रश्न आणि विषय इतके विविध आणि असंख्य आहेत की त्याची नुसती यादी करणे देखील सोपे नाही. प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना विवेदने, याचिका (Petition) भाषणे, मंत्र्याशी प्रत्यक्ष संपर्क. त्याच्याशी पत्रव्यवहार, निरनिराळ्या समित्यांवरील कामकाज, आणि पाठपुरावा या सर्व विहीत मार्गांचा उपयोग करून असख्य प्रश्नांची तड लावण्यात अनेक विषयाना वाचा फोडण्यात आणि अनेक प्रकरणाची वाटचाल सुरू करण्यात त्यांना यश मिळाले आहे. विस्तार भयास्तव त्याचा सूत्ररुपानेच आढावा घेणे क्रमप्राप्त आहे.

### प्रश्नोत्तरे

१–३–७८ त २८–२–७९ या काळामध्ये रामभाऊ म्हाळगी यांनी निरनिराळ्या विषयावरील तारांकित व अतारांकित असे ३७८ प्रश्न विचारले. प्रश्नोत्तरांमध्ये पुढील सारख्या विषयावर शासनाचे लक्ष वेधून त्या संबंधीत कामास गती मिळाली व ती पार पाडली.

१. सेवाग्राम येथे 'यात्री निवास', अजंठाच्या पायथ्यास वसाहत व एलेफंटा बेटाचा मास्टर प्लॅन.

२. ठाणे जिल्ह्यातील 'राई' येथील सॉल्ट ऑफिसची अनेक वर्षे रिकामी राहिलेली इमारत, तेथे मिठ प्रयोगशाळा उघडण्याचा प्रयत्न व यश.

३. महाराष्ट्र राज्यातील हरिजनांवरील अत्याचार, त्यासंबंधी मौलिक सूचना.

४. महाराष्ट्रातील स्वयंपाक गॅस मागणीचे पडून राहिलेले अर्ज.

५. राष्ट्रीय महत्त्वाच्या धर्म स्थानावरील खर्च व व्यवस्था.

६ मुंबई, ठाणे व पुणे येथील मलेरिया केसेस व त्यावरील उपाय; कल्याण परिसरातील कावीळ.

७. तुरुंग सुधारणासाठी केंद्रिय मदत.

८. फूड कॉर्पोरेशनची धान्याची उघडी गोदामे.

९. कल्याण, शहापूर, उल्हासनगर येथील टेलिफोनच्या तक्रारी.

१०. सिमेंट वाटप.

११. अधिक टपालकचेऱ्या उघडण्याचा प्रश्न.

१२. कळवा व वैतरणा स्थानकावर पादचारी पूल.

१३. आजारी उद्योगधंद्याचे प्रश्न.

१४. मिसाबंदीना पेन्शन.

१५. सहकारी साखर कारखान्याबद्दलच्या तक्रारी.

याशिवाय राष्ट्रीय महत्वाचे अनेक प्रश्नही खा. रामभाऊंनी उपस्थित केले.

या पद्धतीने पुढील कामे रामभाऊंच्या प्रयत्नामुळे पूर्ण झाली.

१. नागपूरच्या मॉडेल मिलमधील एका प्रकरणामध्ये सुमारे ५८००० रुपये सरकारकडून एका कंपनीला जास्त देण्यात आले होते. हा प्रकार लोकसभेत प्रश्न विचारून उघडकीस आला. त्यानंतर सदर रक्कम त्वरीत वसूल केली गेली.

२. शासकीय व अर्धशासकीय ग्रंथालयामध्ये आणीबाणीच्या काळातील संघविरोधी प्रचार पुस्तिका काढून टाकाव्यात असा आदेश शासनाने संबंधितांना दिला.

३. ठाणे रेल्वे स्थानकावर पुढील ४ अधिक गाड्या थाबविण्यात येऊ लागल्या. त्यामुळे नागरिकांची चांगली व्यवस्था झाली आहे–

१. मुंबई–मद्रास जनता एक्सप्रेस २. कोल्हापूर-मुंबई सह्याद्रि एक्सप्रेस ३. हावडा–भागलपूर जनता एक्सप्रेस ४. लखनौ–मुबई एक्सप्रेस ५. कल्याण नगरपालिकेला केंद्र सरकारकडून २० वर्षापासूनची येणे बाकी असलेली ७३,६५० रुपयांची रक्कम मिळवून देण्याची व्यवस्था केली.

६. कल्याण गायन समाज या जिल्ह्यातील जुन्या संस्थेस केंद्रसरकारच्या सांस्कृतिक खात्याकडून रु. ३०,००० चे अनुदान मिळाले.

७. आशियाई स्पर्धेत 'कबड्डी' या खेळाचे प्रात्यक्षिक दाखविण्याचे ठरले.

८. पुणे वेधशाळेचे संचलन करण्यासाठी केंद्रसरकारने समितीची नियुक्ती करण्याचे ठरविले.

९. कोल्हापूर एच्. एम्. टी. कारखान्यातील उत्पादनाचे प्रत्यक्ष कामास लवकरच सुरुवात होणार आहे.

८. नासिक येथील शासनाने ताब्यात घेतलेल्या गिरणीतील गैरव्यवहार बंद झाले.

९. शासकीय धोरणामुळे बंद झालेल्या रेगे सिने फिल्मच्या ४९ कामगारांना हिंदुस्तान फोटो फिल्म्स मॅ. कंपनी लि. मध्ये कामावर घेण्यात आले.

१०. सातारा येथे सिटी पोस्टात तार ऑफिस उघडण्याची मागणी पूर्ण झाली.

११. अंबरनाथ येथील ऑर्डिनन्स फॅक्टरीमधील प्राथमिक शाळा व हॉस्पिटल याबद्दलच्या तक्रारी सोडविल्या.

१२. ठाणे व कुलाबा जिल्ह्यातील भात गिरणी मंडळाचे मागणीनुसार मशिनरीच्या आधुनिकीकरणासाठी मुदत मिळाली.

१३. उल्हासनगर येथील एका स्त्रीस भारतीय नागरिकत्व मिळाले.

१४. बदलापूर येथील कारखानदाराचे अर्जानुसार एका रसायनाच्या आयातीवर बंदी घालण्यात आली.

१५. उल्हासनगर येथे टेलिफोन एक्स्चेंजसाठी महाराष्ट्र शासनाकडून जागा मिळवणेबाबत प्रगती झाली.

१६. ठाणे येथील सौंदर्यप्रसाधने बनविणाऱ्या एका कुटिरोद्योगास वार्षिक किंमत रु. पांच लक्ष पर्यंत उत्पादन करण्यास संमती मिळण्याचे संदर्भात सार्वत्रिक धोरणही ठरले.

१७. अंबरनाथ प्रवासी संघटनेच्या मागणीनुसार अंबरनाथ स्थानकाचे बाहेर रेल्वे हद्दीत बाग तयार करण्यासाठी संमती मिळाली.

१८. दुबई येथील भारतीयाशी लग्न केलेल्या अंबरनाथ येथील एका मुस्लिम मुलीस ऑक्टोबर १९७६ पासून पासपोर्ट मिळत नव्हता; तो मिळाला.

१९. रोश कंपनी, ठाणे येथील कामगाराचे परदेशी अधिकाऱ्याबाबतचे तक्रार निवारण झाले.

२०. जुलै १९७६ मध्ये निवृत्त झालेल्या केंद्रिय शिक्षण खात्यातील इंस्ट्रक्टर्सना निवृत्ती वेतन आदी रक्कम मिळत नव्हती. सदर रक्कम दि. ९-८-७८ रोजी देण्याचा हुकूम काढण्यात आला.

२१. सांगलीच्या इंजिनिअरिंग कॉलेजमधील डिप्लोमा कोर्सला डायरेक्टर जनरल ऑफ शिपींगची मान्यता नव्हती, ती देण्याचा निर्णय नौकानयन व परिवहन खात्याने घेतला व तसे नोटिफिकेशन काढण्यात आले.

२२. सोलापूर विभाग दक्षिण मध्य रेल्वेच्या विभागास जोडण्याचे निर्णयावरील कामगारांच्या मागणीनुसार निर्णय जाहीर झाला, अन्य संबंधित प्रश्न मार्गी लागले.

एक आणि अनेक! ही यादी आणखी खूप लांबवता येऊ शकेल. खासदार रामभाऊ म्हाळगींना सादर करण्यांत आलेल्या निवेदनांना अशा रीतीने न्याय मिळत गेला. संबंधितांशी पत्रव्यवहार, प्रत्यक्ष भेटी, मंत्र्याकडे विचारणा व निवेदनावर चर्चा याद्वारे निवेदनावर निर्णय करण्यासाठी रामभाऊंनी अविरत प्रयत्न केले.

## लोकसभेसमोरील भाषणे

लोकसभेमध्ये सत्तारूढ पक्षाच्या खास संख्याधिक्यामुळे बोलण्याची संधी मिळणे तसे कठीणच. तरीहि रामभाऊंच्या संसदपटुत्वाच्या प्रसिद्धीमुळे यावेळी अनेक प्रश्नावर लोकसभेपुढे आपले विचार मांडण्याची संधी त्यांना मिळाली.

कामकाज नियम ३७७ नुसार, धुळे येथील शासकीय गिरणीतील आग, बेलछी येथील हरिजनावरील अत्याचार, अंबरनाथ येथील विमको कंपनीची मशीन खरेदी व त्यामुळे कामगारांवर बेकारी ओढविण्याची शक्यता, महाराष्ट्रातील कोळशाचा तुटवडा व त्यामुळे फाउंड्री धंद्यावर आलेले संकट. आदी विविध लोकसभेपुढे आणले.

मयत मिसाबंदी, व भासुकाबंदीच्या वारसांना मिळावयाच्या पेन्शनबाबत रामभाऊंनी दि. २ ऑगस्ट ७८ रोजी अर्ध्या तासाची चर्चा उपस्थित केली होती. (१) बंदीकालात मृत झालेले व बंधमुक्त झाल्यानंतर ३ महिन्यात मृत झालेले, (२) शारीरिकदृष्ट्या निकामी झालेले, व (३) आर्थिक दृष्टीने विनाश पावलेले असे बंदीचे तीन प्रकार पाडून श्री. रामभाऊंनी पुनर्वसनासाठी कलमवार योजना सुचविली होती. तसेच बिनसरकारी नोकरीतील न घेतलेल्या ४००० मिसाबंदीच्या बाबतीत शासन काय करीत आहे असा परखड प्रश्नही रामभाऊंनी उपस्थित केला.

हरिजनांवर होणारे अत्याचार हे आपल्या देशाचे लाञ्छन आहे असे रामभाऊ मानतात. यामुळे या प्रश्नांवर होणाऱ्या चर्चेमध्ये रामभाऊ आपले विचार व सुचविलेल्या उपाययोजना शासनाचे गळी उतरविण्यासाठी तळमळीने भाग घेतात. बाजितपूर येथील अत्याचाराबाबत बोलत असताना अपराध्यास कठोर शासन व्हावे एवढीच सूचना करून ते थांबले नाहीत तर बिहारमधील जमीनविषयक सुधारणा होत नसल्याने हे तंटे उद्भवतात. जमीनविषयक सुधारणा कधी होणार? असा मूलभूत प्रश्नही निर्माण करतात.

रेल्वे अर्थसंकल्पावर मातृभाषेतून केलेले अभ्यासपूर्ण भाषण वैशिष्ट्यपूर्ण ठरून विरोधी पक्षातील मराठी खासदाराची दाद घेऊन गेले. उपनगरी रेल्वे प्रवाशांवरील दरवाढ मागे घ्या असे म्हणून ते थांबले नाहीत तर उपनगरी रेल्वे तोट्यात चालते या युक्तिवादाचा परामर्श घेताना 'जमा व खर्च अशी केवळ आकडेवारी देऊन तोटा दाखविणे उचित ठरणार नाही' असा इशाराही त्यानी दिला. मागासवर्गासाठी रेल्वे सवलत देते. या भागाच्या विकासासाठी इतर भागाने खर्च सहन केला पाहिजे असे रेल्वे म्हणते. हेच तत्त्व मुंबईबाबत लावले पाहिजे. कारण नोकरीसाठी मागासलेल्या भागातील बरेच लोक मुंबईस येतात हा मुद्दाही त्यानी आग्रहाने मांडला. टीकेसाठी टीका हे त्या भाषणाचे स्वरूप नव्हते. रेल्वे मंत्री श्री. मधु दंडवते यांनी रेल्वेच्या विकासाच्या ज्या योजना मांडल्या आहेत त्याबद्दल त्यानी रेल्वेमंत्र्याचे मनमोकळेपणी अभिनंदनही केले.

अर्थ संकल्प व रेल्वे अर्थ संकल्प या दोन्ही प्रकरणी त्यानी जनभावनाचे जे प्रगटीकरण केले ते त्यांच्या वाढत्या जनसंपर्काचे द्योतकच म्हणावे लागेल. 'ग्रामोद्धार व स्वदेशी ही केवळ घोषवाक्ये राहणार नसून त्याना वस्तुस्थितीचा आधार मिळणार आहे ही आशा अर्थसंकल्पातील नवीन तरतुदीनी पल्लवित झाली आहे' ही त्यांची प्रतिक्रिया अर्थसंकल्पाची ग्रामीण दिशा प्रदर्शित करणारी होती. तसाच 'केरोसिन गॅस, साबण, टूथपेस्ट, टूथब्रश, आगपेटी, प्रेशर कुकर, आंतरदेशीय पत्रे यावरील करवाढीमुळे गरीब व मध्यमवर्गाला चांगलाच फटका बसला आहे. या कराचा फेरविचार झाला पाहिजे' हा त्याचा इशाराही समुचित व मतदार संघातील फार मोठ्या वर्गाचे

प्रतिनिधित्व स्पष्ट करणारा होता.

एकूण आपल्या मतदार संघातील लक्षावधी नागरिकांचा मध्यवर्ती बिंदू 'रेल्वे' हा आहे हे ध्यानात घेऊन रामभाऊंनी रेल्वे हा विषय अग्रहक्काचा मानला, रेल्वे वाहतुकीचा प्रश्न हा एक दोघाच्या हातून सुटणारा नाही याची जाणीव ठेवून प्रवासी संघटना व त्याचे पदाधिकारी यांचे मजबूत संघटन त्यांनी उभे केले आहे. मुंबई ते कर्जत-कसारा व मुंबई ते विरार एवढ्या टापूत रोज जा-ये मिळून ५० लाखाच्यावर प्रवासी रेल्वेने प्रवास करतात. एवढ्या मोठ्या प्रमाणावर असलेला हा गर्दीचा प्रश्न एका दिवसात सुटणारा नाही. तरीही लोकसभेत व रेल्वे यंत्रणेच्या निरनिराळ्या पातळीवर रामभाऊ प्रयत्नशील राहिले. काही बाबतीत काहीसे यश आले. काहींचे यश दृष्टीपथात आहे. तर काही विषयाबाबत फलनिष्पत्ती होण्यास काहीसा अवधी लागणार आहे. १९७९-८० च्या रेल्वे अंदाजपत्रकात समावेश झालेल्या ठाणे जिल्ह्यातील पंचवीस कामांसाठी सुमारे ६ कोटी रुपयाची रक्कम खर्च व्हावयाची होती.

वसई-दिवा रेल्वे कन्स्ट्रक्शन ३ कोटी, मुंबई-कल्याण विभागात जादा विद्युत स्टेशन उभारण्यासाठी ४९ लाख, कल्याण-यार्डाचे नूतनीकरण २५ लाख, घाटकोपर, भांडूप, कळवा आणि डोंबिवली येथे जादा विद्युत उपकेन्द्रे उभारण्यासाठी ६२ लाख, कळवे येथे कारशेड-ईएम्-यू. कोचेसची दुरुस्तीची व स्टॉकची सोय ६६ लाख, अशी प्रमुख रकमांचा त्यात अंतर्भाव आहे

रेल्वेच्या कामात विशेष लक्ष घालून ठाणे जिल्ह्याकरता करून घेतलेली ही कामगिरी उल्लेखनीय आहे.

महाराष्ट्र राज्य एस. टी. च्या केंद्राकडे असलेल्या सुमारे ३·५० कोटीच्या भांडवली थकबाकीचा प्रश्न रामभाऊनी एका विशेष निवेदनाद्वारे लोकसभेत उपस्थित केला तो अतिशय गाजला. एस. टी. ला हे पैसे देण्यात यावेत असेही त्यांनी सुचविले. एस. टी. वर्तुळात या विषयावर चर्चा सुरू असून असे जागरूक व दक्ष लोकप्रतिनिधी असतील तर न्याय खात्रीने मिळेल अशी प्रतिक्रिया त्यावर व्यक्त झाली.

अंदमानचे कारागृह हे 'राष्ट्रीय स्मारक' म्हणून जाहीर व्हावे यासाठी रामभाऊंनी केलेले प्रयत्न, हयात क्रांतिकारक व मृताच्या नातेवाइकाना सन्मानाने बोलावून त्यांचा गौरव करण्याची केलेली सूचना व त्या तुरुंगातून मुक्तता झालेल्या राजकीयबंद्यांच्या निवृत्ती वेतनात वाढ करण्याची केलेली मागणी या सर्व प्रयत्नांची देशभरातून वाखाणणी झाली असून वृत्तपत्रांनी भरघोस प्रसिद्धी देऊन याचे श्रेय त्यांना दिले आहे. राजबंद्यांना दरमहा ५०० रुपये समान निवृत्ती वेतनं हा निर्णय अमलातही येऊ लागला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जीवनावर अनुबोधपट काढण्याबद्दलच्या रामभाऊंच्या प्रयत्नांचेही असेच कौतुक झाले आहे. लवकरच असा अनुबोधपट निघेल.

दिल्लीचे महाराष्ट्र सरकारचे माहिती केंद्र परिपूर्ण असावे. महाराष्ट्रातून निवडून गेलेल्या खासदारांना त्याचा उपयोग व्हावा यासाठी केलेल्या भेटीगाठी, चर्चा, व पत्रव्यवहार या प्रयत्नांना यशही आले आहे.

कल्याण परिसरातल्या काविळीच्या प्रादुर्भावाचे पडसाद संसदेत उमटविण्यातही खासदाराचा हातभार लागला. त्यानिमित्ताने जल-प्रदूषण कायद्याची कारखान्यांकडून अंमलबजावणी व्हावी, डास-निर्मूलनाच्या मोहिमेस वेग आणावा व भुयारी गटार योजनेस अधिक आर्थिक साहाय्य उपलब्ध करून द्यावे या मागण्याचा केलेला पाठपुरावाही संबंधिताचे लक्ष वेधणारा ठरला. संसदीय प्रकाशनांची लायब्ररी ठाणे येथे चालू करून खासदारांनी इच्छुक अभ्यासकांना नवीन उपयुक्त दालन निर्माण करून दिले आहे.

प्रश्नोत्तराचे तासामध्ये शेकडो उपप्रश्नही रामभाऊंनी उपस्थित केले.

## विधेयके व त्यावरील दुरुस्त्या

लोकसभा हे सर्वोच्च कायदेमंडळ आहे. या दृष्टीने सरकारकडून सादर होणाऱ्या विधेयकावर अभ्यास करून वेगवेगळ्या विधेयकांच्या कलमांमध्ये सुमारे ७५ सुधारणा रामभाऊंनी सुचविल्या. वायुप्रदूषण विधेयकावर सुचविलेल्या २७ दुरुस्त्या शासनालाही बहुमोल वाटल्या. इतकेच नव्हे तर सदर विधेयक चिकित्सा समितीवर पाठविण्याचे ठरल्यावर त्या समितीवर सदस्य म्हणून रामभाऊंची नियुक्ती करण्यात आली.

अशा तऱ्हेच्या विधेयकांच्या अभ्यासासाठी लोकसभा मतदार-संघात निरनिराळे अभ्यासगट तयार करून समाजातील मान्यवर विद्वतजनाचा सहकार मिळविण्याची त्यांची योजना होती. समाज-रचनेच्या या महायज्ञात शासन एका बाजूस व जनता दुसऱ्या टोकास राहून चालणार नाही. त्यामध्ये सर्वांचा सहभाग असला पाहिजे. रामभाऊंची मतदार संघ बांधणी ही कल्पना आहे. केवळ शासकीय कृपेचा पाऊस पाडून समाज बलवान होणार नाही, त्यामध्ये प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याची हिम्मत व आत्मविश्वास निर्माण करणे, रामभाऊंचे राजकारण हे असे निर्भय व नि:स्वार्थ आहे.

## विनंती अर्ज (Petitions)

लोकसभेमध्ये विनंती अर्जाद्वारा जनतेची गाऱ्हाणी थेट उभी करणे हा खासदाराला उपलब्ध असलेला आणखी एक मार्ग आहे. गेल्या वर्षी बेडकाच्या निर्यातीवर बंदी घाला अशी मागणी विनंती अर्जाद्वारे करण्यात आली होती. बेडूक प्रकरणास इतकी प्रसिद्धी लाभली आहे की विविध संस्था या विषयावर अभ्यास करू लागल्या असून अनेक वृत्तपत्रातून या विषयावर सतत लेख लिहिले जात आहेत. शेतकऱ्याच्या या प्रश्नावर अशा तऱ्हेने एक राष्ट्रीय चर्चा घडून येत आहे.

एका वर्षात एका पाठोपाठ तीन विनंती अर्ज सादर करून रामभाऊंनी विक्रम केला. हे सर्व विषय जनतेच्या जिव्हाळ्याचेच आहेत. (१) सबर्बन रेल्वे वाहतूक, (२) आयुर्विम्याचे दर व नवीन योजना व (३) लातूर-पंढरपूर-मिरज या रेल्वे मार्गाचे रुंदीकरण. या सर्व विषयावर जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना सखोल अभ्यास करण्यास उद्युक्त करून त्यावर प्रातिनिधिक भूमिकेतून जनतेच्या मागण्याना वाचा फोडणे, हे काम कुशल संघटकच करू शकतो.

वरील सर्व अर्ज लोकसभेने दाखल करून घेतले. तीनही अर्जांना वृत्तपत्रानी भरपूर प्रसिद्धी दिली. आयुर्विमा मंडळाचे विनंती अर्जाला तर हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यांतून प्रतिसाद मिळाला. या विषयावर सर्व प्रकारची मदत देण्याचे आश्वासन देणारी शेकडो पत्रे कार्या-

लयांत आली आहेत. गेली २४ वर्षे जनतेच्या भरघोस पाठिंब्यावर अफाट विस्तार पावलेल्या परंतु त्या जनतेचा आवश्यक तो विचार न करणाऱ्या महाकाय आयुर्विमा मंडळालाही खडबडून जाग आली. शासनानेही पिटिशन कमिटीच्या अहवालाची वाट न पाहता विम्याचे दर कमी करण्यासाठी तातडीने पावले उचलली व एक स्वतंत्र समिती नियुक्त केली.

लातूर मिरज रुंदीकरणाचा, गेल्या शासनाने चेष्टेचा केलेला, जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न पुनरुज्जीवित केल्याबद्दल त्या भागातील जनता रामभाऊंना दुवा देत आहे.

मुंबई सबर्बन रेल्वे वाहतुकीचा प्रश्नही या स्तरावर शासनाने कधींच हाताळलेला नाही. क्षमतेच्या चौपट गर्दी नेआण करणारी लोकल वाहतूक तोटयात कशी हा जनतेच्यापुढील यक्षप्रश्न या विनंतीअर्जाचे कारवाईबरोबर उलगडू लागेल, अशी चिन्हे दिसत आहेत. पुणे–लोणावळा वाहतूक सबर्बन विभागाखाली आणून आताच शासन वेगळ्या तऱ्हेने विचार करणार असा विश्वासही निर्माण होत आहे या विनंती अर्जाचा पाठपुरावा, उपनगरी क्षेत्रातील प्रवासी संघटनाच्या मदतीने सतत चालूच आहे.

अशा तऱ्हेने लोकसभेच्या व्यासपीठावर रामभाऊंनी २८ महिन्यात कामगिरी केली.

## समित्यांचे कामकाज

रामभाऊ लोकसभेच्या पुढील समित्यांवर सभासद होते–

१) लेख लेखा समिती– ( Public Accounts Committee )

२) उद्योग खाते– सल्लागार समिती.

३) संरक्षण खाते– स्थायी समिती.

या समित्यांवर कामालाही त्यांना वेळ द्यावा लागणार आहे. त्या ठिकाणीही आपला अभ्यासूपणा व कार्यकौशल्य याच्या साहाय्याने सत्तारूढ पक्षाचा जबाबदार खासदार म्हणून त्यांनी आपली कर्तव्ये बजावली.

वरील समित्याप्रमाणेच वायुप्रदूषण विधेयकाच्या चिकित्सा समितीवर रामभाऊ सदस्य म्हणून काम करीत होते, या समितीच्या गटाचा दौरा रामभाऊंनी आपल्या मतदारसंघात बेलापूर पट्टी व अंबरनाथ औद्योगिक परिसरामध्ये आखला होता. समितीने इथली परिस्थिती स्वतः पाहिली, तसेच या विषयातील एक तज्ज्ञ डॉ. पु. ज. देवरस यांची साक्ष समितीपुढे घडवून आणली. या जिल्ह्यातील वायु प्रदूषणाचा रोग दूर होईल अशी उपाययोजना नवीन विधेयक निश्चितपणे करील असा विश्वास यामुळेच निर्माण झाला आहे.

प्रदूषणाच्या प्रश्नावर या मतदार संघात जनता परिषदा घेण्याचा रामभाऊंचा विचार होता.

## सहकार्य

असा हा श्री. रामभाऊ म्हाळगी याच्या दोन वर्षांच्या अहर्निश कामाचा त्रोटक वृत्तांत. आकाराने हा लहान नसला तरी केलेल्या कामाच्या प्रमाणात हा लहानच आहे. एवढे हे प्रचंड काम उभे राहू शकते. एका व्यक्तीच्या लोकप्रतिनिधिपदाच्या केंद्राभोवती उभा राहिलेला हा प्रचंड कोष. पण हे लोकप्रतिनिधीचे काम या दृष्टीने अनेकांच्या कामाचे प्रतिनिधित्व या प्रचंड कामामागे आहे. या विस्तृत मतदार संघामध्ये आखीव योजनेनुसार होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये अनेक कार्यकर्त्यांचे कष्ट, योजकता, कौशल्य यांचा सहभाग असतो. १९७७ च्या निवडणुकीतच रामभाऊंना जनतेचा प्रतिसाद मिळाला असे नाही, तर त्यानंतरही दोन वर्षे येथील जनतेने त्यांच्यावर अपार प्रेमाचा वर्षाव केला आहे. त्यातून ही कामे घडली असा रामभाऊंचा विश्वास आहे. अशा सर्व जातीधर्माच्या व पक्षाच्या लोकांनी दिलेले सहकार्य अमोल आहे असे त्यांना वाटते. ☐


मोठमोठ्यांना जे साधत नाही व साधलेले नाही ते येथे एका शाळाकॉलेजात न गेलेल्या स्त्रीने सहजगत्या साधले आहे... –प्रा. वा. ल. कुलकर्णी (प्रास्ताविकातून)

# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची दाद लाभलेले हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र.

तिसरी आवृत्ती । किंमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# हरिणी आणि तिचे पिल्लू

पाटीलबुवा आंधळे

जंगलात हरणांची टोळी होती एक
हरिणी राणी त्यांची सुंदर देख
चतुर, शहाणी, धूर्त तिचा डाव
प्रियदर्शिनी, जरी असे नाव

टोळीत एकदा अवचित घडले
हरिणीच्या पिल्लाचे शिंग वाढले
हरणांना साऱ्या संशय आला
रानोमाळ तो जथा उधळला.

□

अंधाराचे राज्य सुरू जाहले
प्रकाशाच्या पायिका हे न साहले
घेतली प्रेरणा प्रकाशाकडून
चुकलेल्या हरणांना आणले ओढून

माळावर सारी झाली हळू गोळा
समाधीला स्मरून सुरू सोहळा
राज्य होते चालू सुख-शांतीचे
प्रकाशाने दिलेल्या संपूर्ण क्रांतीचे

कळपात परी त्यात एक काळवीट
पाहवेना त्याला सारे सुरळीत, नीट
कानांत काहींच्या कुजबुजला हळू
वाट नवीनच चला चोखाळू

दगडाच्या आसनासाठी सुरू लढाई
शांतपणे पाहो हरिणीबाई
त्यातच तो प्रकाश निमाला
माळावर पुन्हा अंधार आला

□

हरिणीने साधली नेमकी संधी
पुन्हा उभारली सारी शिबंदी
जंगलातल्या प्राण्यांना दाखवीत हात
लाखालाखाची सांगू लागली बात

पाखरांना दाखवी ससाण्याची भीती
वनगाईंना सांगे लांडगे येती
कुत्र्यांचा कळप मागे लागला
मांसाच्या तुकड्यावर जो तो भागला

शेतावर होते बैल राबत
खुराकाचे त्यांना आश्वासन देत
चरणाऱ्या गाढवांना केवळ थाप
उंच होई तिचा हात आपोआप

तोच कावळ्यांची सुरू झाली शाळा
तळ्याकाठी ध्यानस्थ उभा बगळा
कुणा दावी हात, कुणा सलाम
हरिणी करी पुरा इंतजाम

मेल्या जनावरे खाती गिधाडे
अभिनंदनाचा संदेश हरिणी धाडे
हात दाखवीत निघाली पुढे
पायामध्ये तिच्या पिल्लू धडपडे

हरिणी चालली सवे तिचे पिल्लू
मागे धावती पशू सारे उल्लू
कपारी जवळ लवाजमा आला
पशूंनी सारा डाव ओळखला

पुन्हा लढण्या एकत्र होती
इतिहासाची करू पुन्हा आवृत्ती
परी आता आहे कठीण काळ
ओळखून करावा त्यांनी प्रतिपाळ

□